बुधवार, २७ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १३४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 27 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-134 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05




# जीवनाला दान द्यावे लागते...

सरत्या वर्षांला निरोप देताना आणि त्या वर्षातील अनेक घटनांकडे मागे वळून पाहताना अनेक घटनांनी प्रत्येकाचा ऊर भरून येतो. माणसाचे जीवन अनेक अर्थांनी मूल्यवान आणि किमती आहे. जगताना सभोवताल पसरलेले संदर्भ प्रत्येकानेच नोंद घेतले पाहिजेत.



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

अन्न, वस्त्र, निवारा, सुख, दुःख, विरह, प्रेम, एकमेकांचा आदर, मृत्यू, भय, वाईट काळ, आनंदी क्षण, आणि इतर जगण्याचे अनेक कंगोरे अखेरच्या श्वासापर्यंत कम्पल्सरी वाटयाला येतात. आजपर्यंत जागतिक स्तरावरील कोरोना महामारीत आपणा सर्वांना त्याची किंमत कळली हे विसरून कसे चालेल. आयुष्य काढताना असे कटू अनुभव आणि दुःखाचा कल्लोळ आठवणीने क्षण प्रत्येकाच्या वाट्याला त्या त्या वर्षांत येतात तेव्हा त्यांच्यासाठी तो काळ महत्वाचा वाटतो. नव्हे तर जगणं नासवून टाकणारा म्हणून त्याची नोंद घेतली जाते तेव्हा अश्रू अनावर होतात. काय हा प्रवास म्हणावा... माणसांसाठी महाकठीण... असं मनाला वाटत असताना आणि सभोवताल पसरलेल्या काजळीत सभ्यतेची पडलेली विकेट वर्षानुवर्ष मागे जात असताना रुळावर येण्याचे नाव घेत नाही. मुख्य वाट विसरून विचित्र उन्मादात वावरत चालणारी माणसे सभोवताल तरक्की करण्याच्या नादात भलत्याच ठिकाणी पोहोचलेली बघून...

**'मी कुठे दिसलोच तर कळवा मलाही,**
**एवढे फसलात तर फसवा मलाही..'**

ही वैभव जोशी (पुणे) यांची गजल शोध घेण्यास भाग पाडते. आणि हे माणसांनीच माणसांना फसवण्याचे कार्यक्रम कितीतरी तेजीत ठेवले आहेत त्यावेळी हे थांबणार काय? तर त्याचे उत्तर मात्र नकारार्थीच द्यावे लागेल. प्रत्येक वर्षाला अलविदा म्हणण्याचे धाडस करताना बदल आणि त्याचे मूल्यमापन आपण कधीच करीत नाहीत. उलट छाती फुगवून नुसतेच सल्ले देणा-यांना मात्र नानापरीने शिकवण द्यावी लागते. सभ्य राहणे...निगर्वी असणे...भ्रष्टाचारी नसणे.. आणि एकमेकांवर कुरघोडी करणे हे जोपर्यंत थांबणार नाही तोवर....

**'सभी कुछ हो रहा है इस तरक्की के जमाने में**
**मगर ये क्या गजब है, आदमी इनसा नहीं होता...'**

हे म्हणण्याची एखाद्या शायरावर का वेळ यावी? अशी माणसांनी ओढवून घेतलेली नाराजी कधी दूर होणार हा खूप मोठा प्रश्न आहे. देश चंद्रावर गेला परंतू जमिनीवरील नाठाळपणाचे करायचे काय? हा तितकाच चिंतीत करणारा प्रश्न मांडताना मात्र...

**' हे जसे होते; तसे तू कर पुन्हा,**
**वेदना शोधे कुणाचे घर पुन्हा..'**

गझलकार प्रमोद खराडे (पुणे) यांची प्रत्येकाला चिमटीत पकडणारी गझल पुन्हा पुन्हा विचार करण्यास प्रवृत्त करत जाते. संकटे येतात आणि जातात देखील म्हणून हार थोडीच मानायची का? मोठया दिलाने ...आणि जानदारपणे त्या उत्कट क्षणांना आयुष्याचा उत्कृष्ट काळ म्हणून कवेत घेत पुढे जायचे असते. सतत रडगाणे गात थोडीच प्रगती होईल का? तर त्यासाठी माणसं वाचता आली पाहिजेत... काळजातून संवाद साधता आला पाहिजे.. आणि हक्कांच्या माणसांसाठी....समाजाचे काही तरी देणे लागतो यासाठी थोडेफार तरी योगदान देण्यासाठी आपण पुढे सरसावलो तर बघा हा काळ आपल्याला वरदान दिल्याशिवाय राहणार नाही.

अलीकडे जीतेपणी मारायचे आणि मेल्यावर उदो उदो करण्याचा जो केविलवाणा प्रयत्न सुरू आहे तो माणसांनी नोंद घेण्यासारखा आहे. माणसांचे शब्द जिव्हारी लागतात.... ते झोपू देत नाहीत..स्वप्नातही किनारा शोधतात.. अपमान पदोपदी पचवून तो जीव मुठीत धरून राहतो. तेव्हा सरत्या वर्षांत आपण सर्वांनी असे काही केले आहे का? याचे चिंतन करणे गरजेचे झाले आहे. आता तरी बदल घडवून मुखी असू दे गोड बोलणे...हा नव्या वर्षात संकल्प निश्चित करावा लागणार आहे. आनंदी विचार, पुस्तकांची मैफल, संगीताची कास धरली की संवाद साधण्यासाठी उभारी येते. काळ येतो आणि जातो परंतु जीवनाच्या उत्कर्षाचे चित्रगीत एखादा सर्कशीतला जोकर सांगतो आणि आता टीव्हीवरील प्रचंड गाजत असलेली हास्यजत्रा हसवून हसवून आपल्याला पोट धरायला लावत असते आणि आपण तेव्हाच हलके होतो हा संदर्भ प्रत्येकानेच ओठावरचे हसू बरकरार ठेवण्यासाठी घेतला पाहिजे. आणि त्यांच्या कलेला त्रिवार सलाम केलाच पाहिजे.

ही सरत्या वर्षाची वाट दूर जात आहे. अनेक अलगद निसटलेले क्षण आपल्याला या वर्षाने दिले. मात्र प्रतेक क्षणांशी आणि स्वतःशी आपल्याला नेमकं काय हवंय किंवा काय मिळाले? याची गोळाबेरीज करणे आवश्यक ठरते. प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असतात. त्याचे मोजमाप करताना भूतकाळ आणि वर्तमान याची सांगड घालून मार्गक्रमण निर्धारपूर्वक करणे आवश्यक ठरते. पण माणुसकीचा अखंड दोर कदापि सुटता कामा नये. यातच आनंद व समाधान आहे... शेवटी निरोप घेताना...

**'आता बदलूनि पुढे जावूया**
**मुखी गोड बोल ठेवूया,**
**मैफील अशी सजवूया**
**मनामनात ती रुजवूया....'**
**अलविदा 2023..!**



# मुंबईतील बँका उडवून देण्याची धमकी

## खिलाफत इंडिया नावाच्या आयडीवरुन ई-मेल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : येथील भारतीय रिझर्व्ह बँकेला ई-मेलद्वारे धमकीचा मेसेज मंगळवारी आला. खिलाफत इंडिया नावाच्या ई-मेल आयडीवरुन ही धमकी देण्यात आली. आरबीआय, एचडीएफसी आणि आयसीआयसीआय बँकेत बॉम्ब ठेवल्याची धमकी मेलद्वारे देण्यात आली आहे. आरबीआयच्या ई-मेल आयडीवर सकाळी साडेदहा वाजता ई-मेल आला होता. या ई-मेलमध्ये दुपारी दीड वाजता मुंबईतील 11 ठिकाणी बॉम्बस्फोट होतील. आम्ही मुंबईतील 11 ठिकाणी हे बॉम्ब ठेवले आहेत, अशी धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली होती. या प्रकारामुळे मुंबई पोलिस सतर्क झाले आहेत.**



या ई-मेलच्या माध्यमातून काही मागण्यादेखील करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये आरबीआयचे गव्हर्नर आणि देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे नाव घेऊन एक मोठा घोटाळा देशात केला जात आहे. त्यामुळे गव्हर्नर आणि निर्मला सीतारमण यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी ई-मेलमध्ये करण्यात आली होती. तसेच गव्हर्नर आणि निर्मला सीतारमण यांनी राजीनामा न दिल्यास मुंबईतील 11 ठिकाणी बॉम्बस्फोट करण्यात येतील, अशी धमकी देण्यात आली होती. हा ई-मेल प्राप्त होताच, आरोपींनी ज्या ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचा दावा केला होता त्याठिकाणी तातडीने शोध मोहीम राबवण्यात आली. पण या शोध मोहिमेत काही आक्षेपार्ह आढळले नाही. याप्रकरणी पोलीस ठाण्यात आता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून तपास सुरु झाला. हा ई-मेल कुणी केला, त्याचा उद्देश काय होता, याचा तपास मुंबई पोलीस करत आहेत.



# नांदेड रेल्वेस्थानकात रेल्वेडब्याला लागली आग; प्रवाशांची धावपळ

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील हजूर साहेब रेल्वे स्थानकावर देखभाल व दुरुस्तीसाठी थांबविलेल्या एका रेल्वे बोगीला दुपारी अचानक आग लागली. या आगीत रेल्वे बोगी पूर्णतः जळून खाक झाली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी धावाधाव करत या आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने ही बोगी प्रवासी रेल्वेला जोडलेली नव्हती.


नांदेडच्या हुजूर साहेब रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक चारवर एक रेल्वे गाडी नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी उभी होती. आज मंगळवार दिनांक 26 डिसेंबर रोजी सकाळी नऊच्या सुमारास यातील एका बोगीला अचानक आग लागली. पाहता- पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि काही वेळातच बोगी अक्षरशः जळून खाक झाली. तोपर्यंत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धावाधाव करत आगीवर नियंत्रण मिळविले. ही आग नेमकी कशामुळे लागली हे अद्याप समजले नसून रेल्वेचे अधिकारी याविषयी बोलायला तयार नव्हते. दरम्यान रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची मात्र यामुळे धावपळ उडाली होती.

## चर्चेतली बातमी

# मोदी ठरले जगातील बेस्ट युट्युबर पंतप्रधान!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या अधिकृत



यूट्यूब चॅनेलवर तब्बल 20 दशलक्ष सबस्क्राइबर्स मिळवणारे पहिले जागतिक नेते ठरले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलवरच नव्हे तर सर्वच सोशल मीडियावर विविध प्रकारचे व्हिडीओ पाहायला मिळतात. यापूर्वीही मोदींनी सोशल मीडियावर आपली दमदार छाप पाडली होती. आणि आता या नव्या विक्रमासह मोदी भारतातली अन्य राजकीय नेत्यांच्याच नव्हे तर जगभरातील सर्व राजकारण्यांच्या पुढे पोहोचले आहेत. केवळ सबस्क्राइबर्स नाहीत तर व्हिडिओला मिळणाऱ्या एकूण व्ह्यूजची संख्या सुद्धा सर्व नेत्यांहून अधिक आहे. प्राप्त माहितीनुसार, नरेंद्र मोदी यांच्या चॅनेलवर आजपर्यंत ४.५ अब्ज (४५० कोटी) व्ह्यूज मिळाले आहेत. यातील बहुसंख्य व्ह्यूज हे केवळ भारतातीलच नसून जगभरातील प्रेक्षकांचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलवर अंदाजे २३,००० व्हिडिओ असून यूट्यूबच्या पलीकडेही, त्यांचा प्रभाव इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअॅप सारख्या इतर प्लॅटफॉर्मवर विस्तारला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलने एक कोटी सदस्यांचा टप्पा ओलांडला होता, आणि आता २०२३ च्या सरतेशेवटी मोदींच्या चॅनेलवरील सबस्क्राइबर्समध्ये आणखी १ कोटींची भर पडली आहे.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना मानद डॉक्टरेट


## जपानमधील कोयासान विद्यापीठाकडून पदवी मिळवणारे पहिले भारतीय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जपानच्या कोयासन विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. पदवी प्रदान सोहळा मुंबई विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात मंगळवारी पार पडला. या विद्यापीठाकडून अशी पदवी मिळणारे फडणवीस हे पहिले भारतीय ठरले आहेत. कोयासन विद्यापीठाने १२० वर्षांच्या इतिहासात प्रथमच मानद डॉक्टरेट पदवी देण्याचा निर्णय घेतला. फडणवीस यांनी पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, जलयुक्त शिवारच्या माध्यमातून जलसंधारणाच्या क्षेत्रात केलेले कार्य आणि महाराष्ट्रात



सामाजिक समानतेसाठी केलेले कार्य यासाठी ही मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आले. कोयासन विद्यापीठाचे प्रा. इन्युई रुनिन, वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे संचालक यामाशिता योशियो, जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत डॉ. फुकाहोरी यासुकाता हे कार्यक्रमास उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑगस्ट २०२३ मध्ये जपान दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात फडणवीस यांनी कोयासन विद्यापीठाला भेट दिली होती. तेव्हा डीन सोएदा सॅन यांनी फडणवीस यांना डॉक्टरेट देण्याचे जाहीर केले होते. जपान दौऱ्यादरम्यान वाकायामाचे गव्हर्नर शुहेई किशिमोटो यांच्यासमवेत बैठक झाली फडणवीसांची बैठक झाली होती. त्या वेळी कोयाचो येथील मेयर योशिया हिरानो, कोयासन विद्यापीठाचे अध्यक्ष सोईडा युंषो, वाकायामाचे परराष्ट्र व्यवहार संचालक योशितो यामाशिता आदी उपस्थित होते. जपानमधील उद्योगांनी महाराष्ट्रात यावे, यासाठी विशेष कक्ष स्थापन करून गुंतवणूकवाढीला चालना देण्यात येईल. गव्हर्नर किशिमोटो म्हणाले की, महाराष्ट्रातील माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांबरोबर काम करण्याची आमची इच्छा आहे. जपानमधील उद्योजक व व्यावसायिकांचे शिष्टमंडळ घेऊन मी महाराष्ट्रात येईन.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

या ठिकाणी नोंदवला गेला. या वाचनात मला सहभाग देता आला त्याचा आनंद नक्कीच आहे. त्यासोबतच आणखीही तीन विश्वविक्रमांची नोंद या महोत्सवाच्या निमित्ताने झाली. आपल्या पाल्याला गोष्ट सांगण्याच्या उपक्रमात तब्बल ३०६६ पालक सहभागी झाले होते. दुसरा विश्वविक्रम म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५० विद्यार्थ्यांनी ७५०० पुस्तकांचा वापर करून ' भारत ' हा शब्द साकारला. आणि तिसरा विश्वविक्रम म्हणजे तब्बल १८ हजार ७६० पुस्तकांच्या साहाय्याने ' जयतु भारत ' हे प्रेरणादायी शब्द साकारण्यात आले. साहित्य संमेलनात असतात तसेच अनेक मुलाखतीचे किंवा चर्चासत्राचे कार्यक्रम या ठिकाणी आयोजित केले गेले आहेत. अनेक मान्यवर लेखक, शास्त्रज्ञ आणि राजकीय नेते या महोत्सवाला आवर्जून भेट देत आहेत, संबोधित करीत आहेत. हा महोत्सव साकारण्यासाठी राजेश पांडे आणि त्यांच्या टीमने खूप मेहनत आणि नियोजन केल्याचे सहजच लक्षात येते. येथे येणाऱ्या रसिकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही याची जास्तीत जास्त काळजी आयोजकांनी घेतल्याचे लक्षात येते. अनेक नामवंत प्रकाशन संस्था यात सहभागी झाल्या आहेत. अनेक मान्यवर संस्थांनी या महोत्सवाच्या आयोजनात सढळ हाताने मदत केली आहे. सर्वांच्या सहभागाचे आणि सहकार्याचे हे एकत्रित फळ आहे. अशा या महोत्सवांकडे केवळ एक उपक्रम म्हणून पाहून चालणार नाही. हा आपला ज्ञान आणि संस्कृतीचा महोत्सव आहे असे म्हणायला हरकत नाही. या पुस्तक महोत्सवाच्या काळात माझे काही कारणाने पुण्यात येणे झाले आणि पुण्यातील दोन ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार होण्याची संधी मिळाली. त्यातील पहिली ऐतिहासिक गोष्ट म्हणजे पुण्यात १६ डिसेंबर ते २४ डिसेंबर आणि वर उल्लेख केलेला पुस्तक महोत्सव. दुसरी महत्वाची ऐतिहासिक गोष्ट म्हणजे अयोध्येत होणाऱ्या राममंदिरातील प्रभू रामचंद्रांसाठी ' दोन धागे रामासाठी ' हा सौदामिनी हॅन्डलूम येथे अनघा घैसास यांच्या प्रेरणेतून सुरु आहे. अयोध्येत प्रभू रामचंद्रांचे मंदिर उभे राहते आहे. या मंदिरातील मूर्तीसाठी दोन धागे आपणही विणावे, आपलाही खारीचा वाटा त्यात असावा असे प्रत्येकाला वाटल्यास नवल नाही. **क्रमशः**




## आनंदी पहाट

# करिअरसाठी वैशिष्ट्यपूर्ण भूमिका महत्वाची

आधुनिक केसरी

नोकरी मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. तुम्ही कोणत्या प्रकारची नोकरी करत आहात हे सर्वस्व उद्योग आणि नोकरीची स्पर्धात्मकता यावर अवलंबून असते त्याप्रमाणे दृष्टिकोन बदलू शकतात. काहींना त्यांच्या नोकरीच्या शोधात नेटवर्किंग आणि वैयक्तिक परस्पर संबंध प्रभावी वाटू शकतात, परंतु बरेच लोक नोकरीचा अर्ज करण्यासाठी आणि मुलाखत घेण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनावर अवलंबून असतात. ही प्रक्रिया त्रासदायक असू शकते, परंतु या धोरणांमुळे तुमचा प्रवास सुरू होताना तुम्हाला स्पष्टता आणि आत्मविश्वास मिळू शकतो. तुम्ही प्रवेश परीक्षेस बसण्याचा विचार करत असल्यास आणि तुम्ही पात्र असलेल्या कोणत्याही नोकरीसाठी अर्ज करण्याचा प्रयत्न करत असल्यास, तुमच्या करिअरच्या आशा आणि स्वप्नांचे आकलन करण्यासाठी वेळ काढणे हा नोकरी शोध सुरू करण्याचा अधिक समाधानकारक आणि फलदायी मार्ग असू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

तुम्हाला सक्षम बनवण्याचा विचार केल्याने, तुम्हाला विशिष्ट भूमिका आणि करिअर टार्गेट करण्यासाठी तुमचा शोध कमी करण्यात काही बाबातीत मदत होऊ शकते. तुम्हाला कोणत्या प्रकारच्या उद्योगांचा किंवा भूमिकांचा अनुभव आहे किंवा तुम्हाला कशात स्वारस्य आहे; त्याबद्दल विचार करणे आवश्यक असते. एकदा तुम्हाला तुमच्या करिअरची उद्दिष्टे आणि तुम्हाला कोणत्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये स्वारस्य आहे; याची चांगली कल्पना आली, की तुमचे अनुभव या भूमिकांमध्ये कसे उपयुक्त ठरू शकतात याचा विचार करा. तुमची हस्तांतरणीय कौशल्ये ओळखा, ज्यात तुम्ही तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संपादन केलेली तांत्रिक कौशल्ये आणि कामाच्या ठिकाणी कौशल्ये यांचा समावेश आहे. जर तुम्ही तुमची पहिली नोकरी शोधत असाल, तर तुमची हस्तांतरणीय कौशल्ये अभ्यासक्रमाबाहेरील क्रियाकलाप, स्वयंसेवक म्हणून काम करून दैनंदिन जीवनात आनंद देऊ शकतात.



आधुनिक केसरी

## माय चंद्रभागा | लोचनात ||




तुजवीण कोणा भांडु | देवराया ||
लटकीच माया | संसारी ह्या ||२||
जाणिले मी सत्य | नशवराचे वर्म ||
संसाराचे मर्म | भास सारे ||२||
श्वासास जडावा | ईशवराचा संग ||
होऊ नये भंग | कोणे काळी ||३||
मिथ्याच्या संगती | मिथ्यची गुंफण ||
नाही सोडवण | चौऱ्यांशीची ||४||
तुझ्या पायी मिठी | हीच माझी जागा ||
माय चंद्रभागा | लोचनात ||५||

## निरुपण

आधुनिक केसरी

ऐसें रुण उदंड जालें ।रिणाइतीं वेढून घेतलें ।
मग प्रयाण आरंभिलें ।विदेशाप्रती ॥१५॥
दोनी वरुषें बुडी मारिली ।नीच सेवा अंगीकारिली ।
शरीरें आपदा भोगिली ।आतिशयेंसीं ॥१६॥
कांहीं मेळविलें विदेशीं ।जीव लागला मनुष्यांपासीं ।
मग पुसोनियां स्वामीसी ।मुरडता जाला ॥१७॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्‌गुरू
सदाफल देवजी
महाराज

बिना शान्ति मन के भये, आतम रुप न देख। देखै चंचल नीर जिमि, निज प्रतिबिम्ब न पेख ।।१३९।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१३९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्याप्रमाणे हलणाऱ्या, चंचल जलात आपण स्वतःचं प्रतिबिंब पाहू शकत नाही त्याप्रमाणे मन शांत झाल्याशिवाय आत्म्याला आपले चैतन्यमय रूप दिसू शकत नाही. म्हणून योगाभ्यासाद्वारे मनाचा निरोध करणे आवश्यक आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आशंकानिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

याचाच अर्थ असा की या सर्व सृष्टीवर फक्त आणि फक्त ब्रम्हाची म्हणजेच परमात्म्याची सत्ता चालते. हे समजण्यासाठी तरी आयुष्यात एकदा तरी दासबोध वाचावा. समर्थ म्हणतात की परब्रम्ह हे, निर्गुण, निराकार, निर्विकार, निरवयव, निरंजय, निर्विकल्प, निराभास, निश्चल निःसंग, निर्लेप, निष्कर्म निरूपम, निराधार, निरामय, निरूपाधि, निगर्वी आहे. तसेच तो एक अनात्म, अक्षय, अगणित, अपार, अरूप, आजन्म, अढळ, अद्वैत, अनंत अतर्क्य, अच्छेद, अनंत, अच्युत आहे म्हणजेच ब्रम्हवस्तूमध्ये कोणताचं पर्याय नाही. ती कल्पनेच्या पलीकडे आहे. परब्रह्म अमर्यादित आहे. पैलतीर कधी गाठता येत नाहीं.ते आपल्या स्थानातून कुठे तरी जातं नाही,ते भ्रष्ट होय नाही.ते इंद्रियांना दिसत नाही. आपल्या स्थानावर ते कायम ठाण मांडून बसलेले असतात. परब्रम्हास तोडता येत नाही,ते जळत नाही,ते पाण्यात भिजत नाही. परब्रम्ह संपूर्ण विश्वाच्या पलिकडे आहे, त्यांच्या सारखे दुसरे काही नाही परब्रम्हाला जाणून घ्यायचे असेल तर संतवचनावर विश्वास ठेवावा.संतांच्या संगतीत रहावे.आत्मचिंतन करून स्वस्वरूपाशी एकरूप होऊन जावे.

# वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे

आधुनिक केसरी

भगवंताची उपासना करणारे जे ऋषी असतात त्यांचे मन अशा एका अवस्थेमध्ये राहते की, त्या ठिकाणी परमात्माच सर्व काही करतो ही भावना स्पष्टपणे प्रकट होते. भगवंताशी एकरूप होऊन जाण्याचीच ती अवस्था आहे. ऋषींचा मीपणा नष्ट झालेला असल्याने, ‘ मी करतो, मी बोलतो, मी काव्य रचतो, ’ ही भावनाच त्यांना नसून, ‘ परमात्मा करतो, परमात्मा बोलतो, परमात्मा मंत्र रचतो ’ असा स्पष्ट आणि खरा अनुभव त्यांना येतो. या थोर अवस्थेमध्ये ऋषींच्या तोंडून वेदमंत्र बाहेर पडलेले असल्यामुळे ते मानवाची कृती नाहीत. वेद हे खरे अपौरुषेयच आहेत. घराच्या छपराखाली ज्याप्रमाणे सर्व लहानसहान खोल्या येतात, त्याप्रमाणे वेदान्तात इतर शास्त्रे येतात. वेदान्ताच्या गोष्टी किंवा ज्ञान, हे पक्वान्नांच्या ज्ञानाप्रमाणे आहे. जो मनुष्य वेदान्ताचा नुसताच अभ्यास करतो त्याला त्यापासून फारसा फायदा होत नाही. वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे. खरे म्हणजे विद्वान् लोक हा वेदान्त अत्यंत कठीण करून जगाला उगीच फसवितात. मग



सामान्य माणसाला वाटते की, ‘ अरे, हा वेदान्त आपल्यासाठी नाही! ’ वास्तविक, वेदान्त हा सर्वांसाठी आहे. मनुष्यमात्रासाठी आहे. वेदान्ताशिवाय मनुष्याला जगताच येत नाही. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खऱ्या वेदान्ताचे मर्म आहे.

भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातील वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असतां ती तृप्त करून घेण्यासाठीं देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साहाय्याने जड बनणे हे व्यवहाराचे स्वरूप आहे. याच्या उलट, भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे आहे. तेव्हा भगवंताचे साधन हेही जडामधून सूक्ष्माकडे पोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते एक नामच होय. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. पुष्कळ वेळा, चांगले अधिकारी जीव एखाद्या लहानशा वासनेमुळे अडकून पडतात. मग ते अध्यात्मदृष्ट्या चांगल्या कुळामध्ये जन्म घेतात. तिथे त्यांची वासना तृप्त व्हायला वेळ लागत नाही; म्हणून ते लहानपणीच जग सोडून जातात. त्यांच्या मृत्यूचे दुःख करणे बरोबर नाही. वासना ही दुसऱ्या कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ ‘ वास ’ ठेवला तरच ती नष्ट होते. वासना नष्ट झाली की बुद्धी भगवत्स्वरूपच होईल. जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली. ३५४. प्रत्येक वेदमंत्राच्या आरंभी 'हरिः ॐ' असते, ते नामच आहे.

## जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

स्वामीजींनी प्रथम वारकरी सांप्रदायातील भक्ती प्रेम प्रमेयांची साधना करून अल्पकाळातच पातंजली योग सूत्राचे आधारे योगसिद्ध प्राप्त केली. जटाजूटवल्कलेदारी रुद्राक्ष, भस्म विभूषित अशी त्यागमूर्ती समोर पाहताच पाहणारे नतमस्तक होत. सान्निध्यात येणाऱ्या जनसामान्यांना जीवनसृष्टीत स्वर्गीय सौंदर्य संपन्नता आणि स्वानंद निर्माण करण्याचे प्रेरणादायी सामर्थ्य स्वामीजींचे अंगी होते. दिशाहीन समाजाला दिशा दाखविली लहान मुलांना गुरुकुल पध्दतिचे शिक्षण. पडीत नापीक जमिनींची भाविकांकडून श्रमदानाद्वारे जमिनीचे लेवल ,सपाटीकरण करून फुलांच्या फळ्यांच्या बागा फुलविल्या.हजारो शिवमंदिराचे भूमिपूजन केले. गावोगावी,खेडोपाडी ,शहरी विभागात भक्त समवेत जावून प्रवचना द्वारे शिवभक्तीचा प्रचार आणि प्रसार केला.


सामाजिक समता आणि छत्रपती शिवराय पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २७ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# येवल्यातील नियोजित शिवसृष्टीसाठी नव्याने समिती गठित करा : शेळके

## थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**विलास कांबळे (देवांग)**

**येवला :** येथे भव्य शिवसृष्टी व्हावी म्हणून



जवळपास राज्य सरकारचा पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध मिळाला आहे. जागेचा देखील प्रश्न सुटलेला आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून या शिवसृष्टीचा प्रश्न प्रलंबित आहे काम अतिशय धिम्या गतीने चालू आहे. अधिकाऱ्यांची चालढकल व शिवसृष्टी समितीचे दुर्लक्ष यामुळे या नियोजित सृष्टीला वेळ लागत आहे. निवडणुकीत आल्या की पुन्हा हा प्रश्न उपस्थित होईल आणि यावर पुन्हा एकदा राजकारण सुरू होईल हीच गोष्ट येथील शिवसेनेच्या तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांनी हेरली आणि थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. शिवसृष्टीसाठी नेमण्यात आलेली समिती तात्काळ बरखास्त करून नव्याने शिवसृष्टी समितीची नेमणूक करावी या आशयाचे निवेदन शिवसेनेचे मुख्य नेते राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांच्याच पक्षाचे येथील तालुका प्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांनी दिले आहे. हा शिवसृष्टीचा प्रकल्प तालुक्याचा आस्थेचा विषय असल्यामुळे तात्काळ मार्गे लागावा यासाठी मागणी केली असल्याचे तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांनी सांगितले. या निवेदनावर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते किशोर सोनवणे,अमोल सोनवणे,संतोष वल्टे,संदीप शेळके,किशोर बागुल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

येवल्यात शिवसृष्टी व्हावी ही येवले



करांची इच्छा आहे त्यामुळे हा आस्थेचा विषय आहे गेल्या अनेक वर्षापासून आम्ही शिवसृष्टी होणार एवढेच ऐकत आहोत परंतु त्या पद्धतीने कुठेही कामाची गती दिसत नाही त्यामुळे कामाला गती देण्यासाठी शिवसृष्टीची नव्याने समिती गठीत व्हावी, अशी इच्छा आम्हा शिवसैनिकांची आहे .


**पांडुरंग शेळके पाटील शिवसेना तालुकाप्रमुख येवला .**

# 'गोंडर'ला नांदेडचा अण्णा भाऊ साठे साहित्य परिषदेचा राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील अण्णा भाऊ साठे साहित्य परिषदेच्या वतिने उत्कृष्ट साहित्य निर्मितीला विशेष सन्मान दिले जातात. या वर्षीचा पुरस्कार अशोक कुबडे लिखित 'गोंडर' या कादंबरीला अण्णाभाऊ साठे साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा 'शंकरभाऊ साठे उत्कृष्ट निर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर झाला आहे.

दिनांक 24 डिसेंबर रोजी नांदेड येथील शुभारंभ सभागृहात हा पुरस्कार महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत डॉ.प्रल्हाद लुलेकर आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये अशोक कुबडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. अशोक कुबडे यांच्या गोंडर कादंबरीला शंकरभाऊ साठे उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचे प्रा. संजयकुमार मांजरमकर, लालबाजी घाटे, व्ही. जे. वरवंटकर साहेब, एच.पी. कांबळे, प्रा. जी.एल.सुर्यवंशी, एस.एम. गोरे, डॉ.शंकर गड्डमवार आदी अण्णाभाऊ साठे साहित्य परिषद म.रा.व संयोजन समितीने कळविले आहे.




अशोक कुबडे यांच्या गोंडर या कादंबरीला नाशिक येथील कादवा प्रतिष्ठानचा तसेच नागपूर येथील साहित्य विहार संस्थेचा आणि आमरावतीचा विठ्ठल वाघ तिफन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून अनेक पुरस्कार महाराष्ट्रातील अनेक जाहीर झालेले आहेत..




# रामेश्वर गायगोळ यांना शांता शेळके प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान, मंचर यांच्या वतीने साहित्यक्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा नुकताच रविवार दिनांक 24-12-2023 रोजी शरद पवार सभागृह, कृषी उत्पन्न बाजार समिती मंचर येथे पार पडला. याच सोहळ्यात रामेश्वर गायगोळ यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री दत्ताजी पायमोडे तसेच मान्यवर मंडळीच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान झाले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बहुजन विचारवंत मा. प्रा. गंगाधरजी बनबेरे आणि दंगलकार कवी नितीन चंदनशिवे यांनी आपले बहुमूल्य विचार मांडले. सूत्रसंचालन महाराष्ट्र साहित्य परिषद, राजगुरूनगर चे अध्यक्ष श्री संतोष गाढवे यांनी केले. रामेश्वर गायगोळ हे मुळचे जळगाव तालुक्यातील हिंगणा बाळापूर येथील रहिवासी असून यांच्या 'रफू' या कविता संग्रहाला सन 2021 चा शांता शेळके साहित्य गौरव हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला.

# आजच्या काळातील मनुस्मृती म्हणजे ईव्हीएम

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** ईव्हीएम म्हणजे लोकशाहीला धोका असलेली मनुस्मृती कारण मनुस्मृती ही लोकशाहीला धोका होती मागच्या काळात ह्या काळात ईव्हीएम हे लोकशाहीला धोका आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे सहकारी 'सहस्त्रबुद्धे' यांच्या हातुन विषमतावादी, जातीवादी, कर्मकांडवादी, वर्णवादी व्यवस्थेला धरून चालणारी "मनुस्मृति" चे "२५ डिसेंबर १९२७" साली "रायगडच्या पायथ्याशी, महाड" येथे मनुस्मृतिचे दहन केले आणि बहूजनांना जातीवादी समाजरचनेतून मुक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी 25 डिसेंबर 1927 रोजी रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे मनुस्मृती दहन करून देशातल्या महिलांना निस्वार्थ जगण्याचा अधिकार दिला माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला व छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्य अभिषेक नाकारणाऱ्या मनुस्मृती चे विश्वरत्न डॉण. बाबासाहेब आंबेडकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा झालेल्या अपमानाचा बदला घेतला आणि मनुस्मृती जाळली म्हणून दर वर्षी मनुस्मृतीचे दहन केले जाते म्हणून आज ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने धुळ्यात मनुस्मृती नामक अत्याचारी वर्णवादी हुकूमशाही ग्रंथ आणि आजच्या काळातील मनुस्मृती म्हणजे ईव्हीएम मशीन व मनुस्मृती दहन करून स्त्री मुक्ती दीन साजरा करण्यात येत आहे यावेळी उपस्थित जिल्हा अध्यक्ष सागर भाऊ मोहिते भाऊसाहेब बळसाने आनंद अमृतसागर निलेश इंदवे अशोक करंजे अनीताताई सोनवणे सुनीता ताई गोपाळ मालता ताई बागुल विशाल वाघ आकाश घोडे गोरख आहिरे आकाश कदम रोहित वाघ व आदी पँथर उपस्थित होते.



# बाल वैज्ञानिकांमधूनच भविष्यामध्ये शास्त्रज्ञ निर्माण होतील

## गट विकास अधिकारी नलावडे

आधुनिक केसरी न्यूज

धाराशिव : जिल्ह्यातील वाशी येथील पंचायत समितीमधील गटशिक्षण अधिकारी कार्यालयाच्या वतीने दि.21 रोजी वाशी तालुक्यातील घाट पिंपरी येथील न्यू हायस्कूल विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. यात प्राथमिक विभागातून 29 तर माध्यमिक विभागातून 28 तर प्राथमिक शिक्षकांमधून व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांमधून प्रत्येकी एक-एक असे एकूण 59प्रयोग सादर करण्यात आले.

या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन वाशी येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी संतोष नलावडे यांचे शुभहस्ते करण्यात आले. उदघाटन प्रसंगी बोलताना मा.नलावडे साहेब यांनी बाल वैज्ञानिकातूनच भविष्यामध्ये शास्त्रज्ञ निर्माण होतील असे मत व्यक्त करुन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी गट शिक्षणाधिकारी भारत बन यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक आयुब शेख प्रा.शि. जि.प.कें.प्रा.शा. पारा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी न्यू हायस्कूल घाटपिंप्री येथील मुख्याध्यापक श्री शिवाजी आवारे व सर्व शिक्षक वर्ग, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. परीक्षक म्हणून पाटील सर, क्षीरसागर सर, राऊत सर, इंगळे सर, पायघन सर यांनी काम पाहिले. तरी या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनांमधून इयत्ता 6 वी ते 8 वी मधील पहिल्या गटामधूनप्रथम क्रमांक - चि. यश समाधान गवळी जि.प.कें.प्रा. शा.पारा द्वितीय क्रमांक चि. ऑन्ट्रीया रोबिन- अंकुरम विद्यामंदीर वाशी तृतीय क्रमांक - कु.संचिता सचिन कवडे जि.प. कन्या प्रशाला वाशी व इयत्ता 9 वी ते 12 वी च्या दुसऱ्या गटामधून प्रथम क्रमांक - चि. प्रणव प्रशांत देशमुख - क.मा.ज.म.वाशी द्वितीय क्रमांक चि. सार्थक गणेश वारे,ग्रामीण विद्यालय लाखनगाव. तृतीय क्रमांक - कु.समृध्दी दिगांबर इंगोले न्यू हायस्कूल घाटपिंप्री या सर्व विद्यार्थ्यांची



जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आलेली आहे. शिक्षकांची शैक्षणिक साहित्य निर्मिती यामधून प्रथम क्रमांक - श्रीमती. महामुनी सविता श्रीधर - जि.प.कें. प्रा.शा,वाशी तर उच्च माध्यमिक च्या शिक्षिका श्रीमती. चेडे पी.जी,जे.आय.आर. टी,वाशी. यांना प्रथम क्रमांकया शिक्षकांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आलेली आहे. कार्यक्रमाचा समारोप हा सर्व सहभागी विद्यार्थ्यांना व विजेत्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी यांचे वितरण करुन करण्यात आला.

# पूंछ हत्याकांड

आधुनिक केसरी

जम्मू आणि काश्मीरमधील पूंछमध्ये कथितरित्या लष्कराच्या कोठडीत झालेल्या मृत्यू प्रकरणाची सोमवारी चौकशी सुरू झाली. लष्कराने प्राथमिक चौकशीदरम्यान ब्रिगेडियर हुद्द्याच्या एका अधिकाऱ्याची बदली केली असून ४८ राष्ट्रीय रायफल्सच्या अन्य तीन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. पूंछ जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराने मोठया प्रमाणात शोधमोहीम हाती घेतली आहे. या तपासादरम्यान ताब्यात घेण्यात आलेल्या तीन संशयितांचे मृतदेह शुक्रवारी आढळून आले होते. मृतदेहांच्या अवस्थेवरून त्यांचा छळ झाल्याची शंका व्यक्त केली जात असून याच्या ध्वनीचित्रफिती समाजमाध्यमांवर पसरल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला असून लष्करानेही चौकशीची घोषणा केली होती. त्यानुसार सोमवारी चौकशी सुरू झाली असून एका ब्रिगेडियर दर्जाच्या अधिकाऱ्याची बदली करण्यात आल्याचे तसेच अन्य तीन अधिकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली. या अधिकाऱ्यांची नावे अद्याप समजलेली नाहीत. कोठडीत कथितरित्या मृत्यू झालेल्या एकाचे नातलग मोहम्मद सादीक यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद रफीक आणि मोहम्मद रशीद हे दोन पोलीस आणि जगी व गणेश अशा दोन खबऱ्यांसह आलेल्या तिघांनी संबंधित व्यक्तीला चौकशीसाठी नेले होते. त्यामुळे हे पोलीस, खबरे तसेच लष्कराच्या मेजरचे नाव तक्रारीमध्ये समाविष्ट करण्याची तसेच राष्ट्रीय रायफल्सचा तळ तातडीने दुसरीकडे हलविण्याची मागणी सादीक यांनी केली. पूंछमध्ये सुरू असलेली अतिरेक्यांची शोधमोहीम आणि कोठडीतील मृत्यूंच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख मनोज पांडे यांनी सोमवारी काश्मीरचा दौरा केला. पूंछ येथे जाऊन त्यांनी शोधमोहीमेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. 'नियमांच्या चौकटीत राहून' तपास करा, असा सावधगिरीचा सल्ला लष्कप्रमुखांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिला. लष्कराच्या अतिरिक्त जनसंपर्क महासंचालकांच्या 'एक्स' खात्यावर यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. शुक्रवारपासून पूंछ आणि राजोरी जिल्ह्यांतील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली असून ती अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या तीन नागरिकांच्या हत्येनंतर अफवा पसरू नयेत व कायदा-सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. तीन नागरिकांच्या हत्या झालेल्या सुरनकोटला भेट देण्याच्या तयारीत असलेल्या पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांना नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांच्या पक्षाने केला आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# इंजिनियरिंग शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी...

आधुनिक केसरी

**तरुण शिक्षित पिढीची तक्रार आहे की नोकऱ्या मिळत नाहीत.उलट उद्योग क्षेत्राचे म्हणणे आहे की पदाला योग्य कुशल उमेदवारच मिळत नाहीत! म्हणजे विद्यापीठ,कॉलेज जे शिक्षण देतात ते कुचकामाचे आहे.खास करून इंजिनियरिंग,मेडिकल अशा प्रोफेशनल क्षेत्रात प्रामुख्याने नोकरी मागणारे अन् देणारे यांच्यात रस्सीखेच सुरू आहे.याचे मुख्य कारण गेल्या काही वर्षांत quantity विरूध्द quality यात शीत युद्ध चालू आहे.शिक्षणाचे खाजगीकरण झाल्या नंतर साखर सम्राटा सारखे शिक्षण सम्राट,महर्षी तयार झाले.**



इंजिनियरिंग ,मेडिकल साठी काँग्रेस गवता सारखी कॉलेज वाढ झाली.यात राजकारणी नेते,आमदार खासदार याचीच जास्त कॉलेजेस आहेत.त्यामुळे शिक्षण हा धंदा होऊन बसला.सरकार ने देखील,आय आय टी, एन आय टी ची संख्या कितीतरी पटीने वाढवली अचानक.त्यामुळे जिथे पूर्वी ५० विद्यार्थी असायचे त्या वर्गात दीड दोनशे विद्यार्थी असतात.प्रवेश संख्या वाढली पण त्या प्रमाणात प्राध्यापकाची नियुक्ती झाली नाही.आजकाल राज्य,केंद्र सरकारच्याच कॉलेजात,विद्यापीठात, आय आय टी त अनेक पदे कित्येक वर्षा पासुन रिक्त आहेत.पगार देणे सरकार च्या हाती असल्याने नियुक्त्या करायला परवानगीच मिळत नाही.अनेक कॉलेजात प्रभारी प्राचार्य असतात वर्षानुवर्षे!अनेक सरकारी इंजिनियरिंग कॉलेज मध्ये गेल्या अनेक वर्षात ज्येष्ठ प्राध्यापकाची भरती झालेली नाही.फक्त लेक्चरर च्या एंट्री लेवलवर नियुक्त्या होतात.माझे एका आय आय टी चे डायरेक्टर मित्र सांगत होते,त्यांनी आता पदे भरणे सुरू केले तर सर्व रिक्त पदे भरायला दहा वर्षे लागतील!इतकी वाईट परिस्थिती आहे.

तंत्रज्ञान झपाट्याने बदलतेय. त्यानुसार त्या वेगाने अभ्यासक्रम बदलायला हवेत. प्रयोगशाळा अद्ययावत असायला हव्यात. पण तसे होत नाही.ज्या संस्था स्वायत्त आहेत त्या हे करू शकतात काही प्रमाणात.पण एका विद्यापीठाशी संलग्न शेकडो कॉलेजेस असतात.त्याचे कायदे, त्यांच्या प्राधिकरणाचे नियम,हे विशिष्ठ चौकटीत बांधलेले असतात.त्यांना सातत्याने बदल करणे शक्य नसते.हजारो विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन,कॉलेजेस च्या गुणवत्तेचे संवर्धन,बदलत्या काळा प्रमाणे,इंडस्ट्रीच्या गरजा प्रमाणे बदल हे सारे कठीण,अशक्यच होऊन बसते! मील मध्ये ठराविक वेळेला माणसे आत जातात,अन् ठराविक वेळ झाली की मान मोडून काम करून थकलेले चेहरे बाहेर येतात तसे चित्र आहे आजचे.

इंजिनियरिंग शिक्षणात थियरी इतकाच किंबहुना जास्त भर प्रॅक्टिकल वर हवा असतो.त्यासाठी आधुनिक अद्ययावत प्रयोगशाळा हव्यात.आधुनिक संगणक, सॉफ्टवेअर हवे.त्यासाठी भरपूर ग्रँट हव्यात. खाजगी संस्थेची त्यासाठी तयारी नसते. सरकारी कॉलेजेसला देखील अपुरे अनुदान मिळत असल्याने हे आधुनिकीकरण शक्य नसते.तेच ते जुने शिकवून वेळ भागविली जाते.इंजिनियरिंग च्या मुलांनी इंडस्ट्रीत काम करून, प्रोजेक्ट करणे,एखादी नवी समस्या सोडवणे अपेक्षित असते. पण वाढलेल्या प्रवेश संख्येमुळे फायनल इयरला इतके हजारो विद्यार्थी असतात की त्यांची इंडस्ट्रीत सोय लावणे केवळ अशक्य असते.मग काहीतरी कसेतरी काम करून रिपोर्ट लिहिणे,भरपूर गुण देऊन पास करणे असे उद्योग प्राध्यापक मंडळी करतात! आजकाल विद्यार्थ्यांची मनोवृत्ती पार बदलली आहे.ज्ञान संपादन,शिकणे,यात फारसा रस नाही.वर्गात हजेरी नाही. अभ्यास कामापुरताच .फक्त पदवीचा कागद हवाय.चांगल्या ग्रेडस, परसेंटेज दाखवणारी गुणपत्रिका हवीय.चांगले पॅकेज असलेली आरामाची नोकरी हवीय.पण ही नोकरी आम्ही तुलाच का द्यावी,तुझे कौशल्य काय? योग्यता काय? या प्रश्नाचे मात्र उत्तर नाही.विद्यापीठातील परीक्षेचे मूल्यमापन,विद्यार्थ्यांची गुणवत्ता अन् त्याचे गुण याचा अर्था अर्थी संबंध नसतो.स्वायत्त संस्था देखील फक्त गुण उधळतात.काही अपवाद सोडले तर गुणवत्ता वाढीचे प्रयत्न क्वचितच दिसून येतात.खरे तर यासाठी नॅक,इन् बी ए या संस्थांचे मूल्यांकन आहे.पण त्यातला फोलपणा, नाटकिपणा आता सिध्द झालाय. सगळे काही म्यानेज करण्याचीच प्रवृत्ती दिसून येते.विविध मान्यता मिळविण्यासाठी,विद्यापीठात,सरकार दरबारी कसा भ्रष्टाचार होतो हे उघडे गुपित आहे.त्या कहाण्या वृत्त पत्रात, टी वी वर येतातच! पदवी अभ्यासक्रमा पेक्षा पदव्युत्तर अभ्यासक्रम,पी एच डी या संबंधीची परिस्थिती आजकाल अतिशय भयानक,गंभीर आहे.इथे मुलं वर्गात न येताच पास होतात.खाजगी कॉलेजात तसा अलिखित करारच असतो.तुम्ही फक्त फी भरा.पदवी मिळणारच.पी एच डी चे संशोधन हाच संशोधनाचा विषय.. सुमार प्रबंधा ना मान्यता मिळते.पैसे देऊन परीक्षक म्यानेज करणे,कॉपी पेस्ट करणे असे प्रकार चालतात.अगदी आय आय टी तल्या संशोधना चा दर्जा देखील चार दशका पूर्वी होता तसा राहिला नाही हे कटु सत्य! खरे तर कागदोपत्री यू जी सी, ए आय सी टी ई,विद्यापीठ यांचे नियम,कायदे चांगले भासतात..पण ते फायलितच राहतात.अंमलबजावणी शून्य.तिथे सगळ्या तडजोडी होतात.स्विकारल्या जातात.

शिक्षण अन् नोकरी,  करियर या गोष्टी डी लिंक केल्या तर चांगले बदल दिसून येतील.नोकरी करियर हे  वयक्तिक कौशल्य,गुणवत्ता,चारित्र्य,व्यक्तिमत्व यावर अवलंबून असते,असावे.शिक्षण हे शुध्द ज्ञान संपादनासाठी असावे.मूल्यमापन कठोर अन् साक्षेपी असावे. गुणाची उधळण नको.स्वायतत्ता ही गुणवत्ता वाढी साठीच वापरावी.शिक्षणाचा धंदा करण्यासाठी नाही..हे घडून आले तर निश्चित चांगले परिणाम दिसतील..आशेला जागा निश्चित आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# मातृभूमी, समाजाचे ऋण फेडता आलेच पाहिजे

आधुनिक केसरी

**आपला जन्म कोणत्याही देशात, धर्मात पंथात, समजात होऊ द्या आपण ज्या भुमित जन्म घेतला आहे. त्या मातृभुमिचे आपला जन्म ज्या मातेच्या उदरी झाला त्या मातेच व ज्या समाजात आपण लहानाचे मोठे झालो त्या समाजाचं ऋण फेडण हे आपलं आद्य आणि प्रथम कर्तव्य आहे. ही कर्तव्य पुर्ण करुन आपली आपली शक्ती ताकद बळ हे इतर कोणत्याही कार्यासाठी वापरासाठी हरकत नाही. आपली मातृभूमी,माता व समाज यांचं ऋण हे खुप मोठं असतं.आपण कितीही जन्म घेतले कितीही प्रयत्न केले तरी देखील हे ऋण कधीच  फिटणार नाही एवढे अनंत उपकार आपल्यावर आपल्या मातृभूमीचे मातेचे आणि समाजाचे आपल्यावर असतात.**

आपल्या मातृभूमीच्या हितार्थ कल्याणासाठी उपयोगी ठरण्यासाठी आपल्यावर ऋण आहेत याची तरी अगोदर जाणीव झाली पाहिजे हि जाणीव होण्यासाठी खरी मानवता आपल्या मध्ये संचारली पाहिजे. धर्म अर्थ काम मोक्ष हा धर्म सिद्धांत निटपणे समजला तर ऋण फेडण्यासाठी याची आठवण आपल्याला कोणाकडून करून घेण्याची अथवा देण्याची आवश्यकता भासत नाही. कितपत योग्य आहे .ऋण हे ऋण असतं याची जाणीव ठेवून ते फिटो न फिटो पण ते फेडण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणं हेच मानवी जीवनाचं मुख्य रहस्य आहे.मातृभुमि आणि समाज निर्मिती साठी  प्रत्येकाने थोड्या थोड्या प्रमाणात योगदान दिले तर खुप मोठं कार्य होऊ शकत.आणि एक आदर्श समाज निर्मिती होऊ शकते. आज प्रत्येकाची मानसिकता हिच आहे माझ उत्तम आहे मला इतरांच फार काही देणं घेणं नाही.आणि ह्याच भावनेतून प्रत्येक व्यक्ती आत्मकेंद्रित होण्याकडे झुकतो आहे. आत्मकेंद्री व्यक्ति स्वार्थाच्या असा काही चक्रव्युहात अडकतो कि पुन्हा तो कोणाच्याही कामाचा उरत नाही हे वास्तव आहे.आपण आज या उंचीवर आहेत यासाठी कोणीतरी झिजल आहे हे विसरून चालणार नाही.मग आपण देखिल आपल्या अमूल्य जीवनातील थोडा वेळ आपलं ऋण चुकत होण्यासाठी दिला पाहिजे. आत्मकेंद्री वृत्ती कडे सगळ्यांनीच झुकतं माप दिलं तर मग भविष्यकाळा मात्र कठिण आहे.आज आपण ज्या उंचीवर आहोत याच्यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे. लोक कल्याण करण्यासाठी समर्पित भावनेने आपलं आयुष्य कारणी लावलं आहे. म्हणून आपण या स्थितीत आहोत आणि जर आपण योगदान दिले तर याचा  भविष्यातील पिढी साठी नक्कीच खुप मोठा फायदा होईल.हल्ली जग खुपच गतीमान झालं आहे माझ्याकडे वेळेचा अभाव आहे अस प्रत्येकाला वाटतं.पण जे वाटतं ते वास्तविक सत्य आहे कि  आपला गैरसमज आहे हे फक्त स्वतःला उत्तम पणे महित असतं.मग आपण ज्या मातृभुमित मातेच्या पोटी आणि समाजात जन्म घेतला त्या मातीच मातेच आणि समाजाचं कहीच ऋण फेडु शकलो नाहीत तर हा जन्म निर्थक आहे.जन्म कुठेही घ्या ज्या भुमित आणि मातीत जन्म घेतला त्या मातीचा मातेचा आणि त्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आपलं योगदान खर्ची पडलच पाहिजे.आणि जर योगदान खर्ची पडल नाही तर मग आपण आपल्या व्यक्तिगत आयुष्यात काहीही मिळवलं तरी ते निश्चितच ते निरर्थक आहे.कारण आपला हा मानवी देह,आपली माता आपली माती आणि आपला समाज यांच्या कारणी लागलाच पाहिजे मग तो व्यक्ति कोणीही असो तरच आपल्या जीवनाचा सदउपयोग आहे.अन्यथा आपण फक्त जन्माला आलो आणि जीवन जगलो एवढंच समाधान आपल्याला मिळु शकतं या पेक्षा फार काही विशेष आपल्या पदरात पडत नाही.म्हणून हा आपला मानवी देह आपल्या मातीच मातेच समाजाचं आणि देशाच ऋण फेडण्यासाठी आहे.हि भावना सदैव जागृत असली पाहिजे.पण दुर्दैव हेच आहे की हिच मुख्य बाब मुख्य विषय सध्या आपण सोईस्करपणे विसरत चाललोय. त्यामुळे याचे परिणाम पुढील अनेक पिढ्यांवर होतील या मध्ये शंका नाही.आणि याचे थेट परिणाम समाजव्यवस्थेवर होऊन सांस्कृतिक वैचारीक नुकसान होत आहे.जो पायंडा आदर्श असतो त्याला कुठे तरी छेद जाऊन पुढील अनेक पिढ्यांवर याचे प्रतिकुल परिणाम होतात म्हणून आदर्श हे प्रस्थापित आणि वृद्धिंगत झालेच पाहिजेत आपण आपल्या मातृभुमिच मातेच आणि समाजाचं ऋण फेडण हा एक आदर्शच आहे आणि तो आपण पाळला पाहिजे व पुढील पिढ्यांसाठी एक आदर्श पथ म्हणून स्थापित केला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# फटाका हॉर्न वाजवणाऱ्या दोन दुचाकींवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**इमरान खान पठाण**



वाहन चालवतांना, विना हेल्मेट, विना सिटबेल्ट आणि विना परवाना वाहन चालविणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे . तसेच गाड्यांना कर्कश हॉर्न लावुन ते जोरजोरात वाजवत वाहन चालविणे सुद्धा बेकायदेशीर आहे . या बाबत शहर वाहतूक पोलिसांनी आता विशेष मोहीम उघडली असून, त्यानुसार कारवाई करणे सुरु केले आहे . . !

**सुनिल किनगे, ( पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा अकोला )**

**अकोला :** दुचाकी गाड्यांना मॉडीफाय करणे आणि त्यांना मोठा हॉर्न बसवणे ही हल्लीच्या काळात जणू काही फॅशनच बनली आहे. गाड्यांच्या नंबरप्लेटवर नावाचा उल्लेख करणे असो किंव्हा साध्या गाडीला बुलेट हॉर्न अथवा बुलेट गाडीला फटाका हॉर्न बसवून लोकांचे आकर्षण आपल्याकडे खेचून घेण्यासाठी हा ट्रेंड काही दुचाकी शौकिनांकडून सर्रास सुरू आहे. यावर आळा बसविण्यासाठी अकोला शहर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलला आहे. शहरातून फटाका हॉर्न वाजवत फिरणाऱ्या दोन बुलेट गाड्यावर शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल किनगे यांनी नुकतीच कारवाई केली आहे. अनावश्यक हॉर्निगमुळे ध्वनी प्रदुषण तर होतेच,पण चित्रविचित्र आवाजामुळे इतरांचे लक्ष विचलित होऊन अपघात होण्याची दाट शक्यता असते. शिवाय असेल प्रकार करणाऱ्यांमध्ये अल्पवयीन वाहन चालकांचे प्रमाण वाढत आहे. त्यामूळे पालकांनी लहान मुलांच्या हाती आपले वाहन देऊ नये असे आवाहन शहर वाहतूक पोलिसांनी केले आहे. अन्यथा पालकांवर कारवाई केली जाईल असा इशारा सुद्धा पोलिसांनी दिला आहे. कर्कश आवाजात हॉर्न वाजवल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास होतो. आणि इतर वाहन चालकांचे लक्ष विचलित होऊन लहान मोठा अपघात सुद्धा होऊ शकतो. त्यामूळे वाहतूक पोलिसांनी दोन बुलेट गाड्यावर कारवाई करून सदर गाड्या पोलीस स्टेशन मधे जमा केल्या आहेत. ही कारवाई वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल किनगे व त्यांच्या चमूने केली आहे.

# महिलांनी आचरणातील संस्कार, साधी राहणी, सेवाभावी वृत्ती, संयम यांचा समन्वय साधावा

## आध्यात्मिक गुरु ब्रह्माकुमारी शिवानी दीदी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 'इनरव्हील' ही जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय महिला संघटना आहे. 100 पेक्षा जास्त देशांमधे इनरव्हीलचे एक लाखांपेक्षा जास्त सदस्य आहेत. सेवा व मैत्री हे इनरव्हीलचे ध्येय आहे आणि यानुसार सर्व सदस्य तनमन धनाने सेवाभावी कार्य करत असतात. इनरव्हीलचे कार्य चार स्तरांवर चालते. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय ,जिल्हा आणि क्लब स्तरावर चालणारे हे कार्य विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने सर्व क्लब सदस्यांना एकत्र आणते, एकमेकींना भेटण्याची, आपआपसातील मैत्रीचे नाते घट्ट करण्याची संधी या निमित्ताने ऊपलब्ध करुन देते.

इनरव्हील डिस्ट्रीक्ट 313 चा ' रॅली' हा दरवर्षी आयोजीत होणारा कार्यक्रम या वर्षी इनरव्हील क्लब छत्रपती संभाजीनगरतर्फे नुकताच साईतीर्थ, शिर्डी येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला डिस्ट्रीक्ट 313 मधील पन्नास क्लबमधील 500 च्यावर सदस्यांनी सहभाग नोंदवला. या रॅलीच्या निमित्ताने 'प्लास्टीक नाकारुया' हा संदेश देणारे फलक बनविण्याची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या क्लबसाठी 'पर्यावरण संरक्षण' या विषयावर कार डेकोरेशन स्पर्धा घेण्यात आली. पर्यावरणाची काळजी घेण्याच्या दृष्टीने समाज प्रबोधन व्हावे, यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विविध स्पर्धा व मनोरंजनाच्या कार्यक्रमाबरोबर मुख्य आकर्षण होत्या जागतीक किर्तीच्या अध्यात्मिक गुरु ब्रह्माकुमारी शिवानी दीदी. आपल्या भाषणात शिवानी दीदींनी उपस्थित महिलांना आचरणातील संस्कार,साधी रहाणी, सेवाभावी वृत्ती, संयम यांचा कसा समन्वय साधावा, याबद्दल साध्या सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. सुविचार, सत्कर्म संस्कार हेच सतयुग पुन्हा येण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. इनरव्हील क्लब छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष सौ. रचना मालपाणी, संयोजक माजी जिल्हाध्यक्ष ऊषा धामणे, क्लब अध्यक्ष डॉ. ईना नाथ यांनी ऊपस्थितांचे स्वागत करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी समिती सदस्य सहसंयोजक सौ. लता मुळे, मंगल चव्हाण, कोषाध्यक्ष माधुरी अहिरराव, वृषाली शिंदे, शिवानी लड्डा तसेच क्लबच्या सदस्यांचा सहभाग होता. क्लब सदस्य अंजली सावे व शामल भोगले यांनी सुंदर व सुरेल ईशस्तवन सादर केले. प्रतिभा धामणे व छाया भोयर यांनी बहारदार सूत्रसंचलन केले. ऊत्कृष्ठ नियोजन, आयोजन आणि आदरातित्थ्य याचे सर्वदूर कौतुक होत आहे.




# धुळे महानगरपालिकेवर प्रशासक नेमणूक करा : रणजित भोसले

आधुनिक केसरी न्यूज



धुळे : महानगरपालिकेवर जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी जि प यांना प्रशासक म्हणून नियुक्त करा असे निवेदन रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी राष्ट्रवादी पक्षामार्फत देण्यात आले. 30 डिसेंबर 2023 रोजी धुळे महानगरपालिका वरील लोकप्रतिनिधींची मुदत संपत आहे. धुळे मनपाचे सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक वेळेवर होऊ शकत नसल्यामुळे मनपावर शासकीय प्रशासक नेमणे क्रमप्राप्त आहे.पाच वर्षे धुळे मनपात भाजपच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर भ्रष्ट कारभार,गुंडगिरी माजलेली होती. मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार, अनियमितता झालेली आहे. मनपाला दोन नंबर वाले ठेकेदार चालवतात.धुळे मनपा राजकीय लोकांचा अड्डा बनलेली आहे. प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर दबाव निर्माण करण्यात आलेला आहे. धुळे मनपावर आर्थिक व प्रशासकीय शिस्त राहिली नाही. 30 डिसेंबर 2023 रोजी लोकप्रतिनिधी मुदत संपल्यानंतर जास्तच गोंधळ निर्माण होऊ शकतो. पंचवार्षिक निवडणुका कधी होतील हे सांगता येत नाही. तोपर्यंत मनपाचा कारभार चुकीच्या लोकांच्या हातात जाणे धोकादायक आहे. धुळे मनपा 'ड' वर्गात मोडते. मनपाचा 2023-24 चा अर्थसंकल्पात जवळपास 600 कोटीचा आहे. धुळे मनपाला शिस्त लावणे गरजेचे आहे. त्यासाठी धुळे मनपावर आय.ए.एस दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करणे गरजेचे आहे. नाहीतर धुळे मनपात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार फाईली गहाळ होऊ शकतात. त्यामुळे धुळे मनपावर जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी ( जि. प ) यांना प्रशासक म्हणून नियुक्त करावे अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते हे मुख्यमंत्री, राज्यपाल, विभागीय आयुक्त यांना शेकडो पत्र पाठवून तशी मागणी करतील. तसेच रणजीत राजे भोसले यांनी धुळेकर जनतेला आवाहन केले आहे की,सर्व प्राध्यापक, शिक्षक, अभियंता, महिला, युवा कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल,विभागीय आयुक्त, यांच्या ईमेलवर किंवा व्हाट्सअप वर धुळे महानगरपालिकेच्या प्रशासक पदी जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना म्हणून नियुक्ती करावी अशी विनंती करावी. असे पक्ष मार्फत आवाहन करण्यात येत आहे. यावेळी रणजित राजे भोसले, जोसेफ मलबारी, रईस काजी, राजू डोमाडे, महेंद्र बागुल, शकीला बक्ष, जयश्री घरटे,जमीर शेख, राजेंद्र सोळंकी भीका नेरकर, अशोक धुळकर, राहुल महाजन,राजू मशाल, समद शेख, हाजी हासीम खुरेशी, रामेश्वर साबळे, शोएब अन्सारी, कल्पेश मगर,डॉमनिक मलबारी, कुणाल वाघ, दत्तू पाटील, आकाश बैसाणे, भटू पाटील, भूषण पाटील, इरफान पठाण मयूर पाटील, नुरुद्दीन शहा, युनूस शेख, विश्वजित देसले, भाग्येश मोरे ,वैभव पाटील, जावेद बेग, सोनू घारू, गोलू नागमल, सलमान खान उपस्थित होते.

# कार दुभाजकाला धडकून धडकून अपघात



आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** मंठा तालुक्यातील तळणी येथे डिव्हायडरला धडकून कारच भीषण अपघात सदर घटना रात्री साडेबारा वाजेच्या दरम्यान घडली लोणार शहरातील राजू सोसे यांचे चिरंजीव रोहन सोसे वय 35 वर्ष हे रात्री आपल्या गाडी क्रमांक MH 20 CS 9261ने साडेबारा वाजेच्या दरम्यान लोणार कडे येत असताना गाडी तळणी येथे डिव्हायडरला धडकली अपघात एवढा भीषण होता की चालक रोहन सोसे यांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण जखमी झाले आहे सदर घटनेचा तपास तळणी पोलीस स्टेशनचे कर्मचारी करीत आहेत. शहरातील युवा उद्योजक म्हणून ओळख असलेले रोहन सोसे यांचा सोसे डिजिटल व्यवसाय होता. युवा उद्योजक गेल्या शहरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.



# सामाजिक समता आणि छत्रपती शिवराय

आधुनिक केसरी

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ || अवघ्या संत परंपरेने महाराष्ट्राला अवघे जग विष्णुमय आहे. भेदाभेद करणे अमंगल आहे. असा उपदेश केला. याच संतांच्या भूमीतून जन्म घेतलेल्या निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारु अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी, यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला राजसकट हाकतांना हा उपदेश तंतोतंत पाळला. म्हणूनच 18 पगड जातीतला प्रत्येक मावळा स्वराज्यासाठी देहाची समशेर होऊन लढत राहिला. आज मात्र हाच भेदाभेद अमंगळ करून लढणाऱ्या महाराष्ट्रातील जातीपातींना आणि त्यांनी आपापसात लढावे म्हणून आगीत तेल ओतणाऱ्या स्वार्थी समाजकंटकांना पाहताना, पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज यांची आठवण प्रकर्षाने जाणवते आणि ही राजकीय परिस्थिती पाहता एक राष्ट्राचा शिल्पकार म्हणून स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची सामाजिक समता आपल्या सर्वांसमोर या लेखनातून ठेवावी म्हणून हा प्रपंच.**

महाराजांचं वेगळेपण हेच आहे की त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना, सैनिकांना, कर्मचाऱ्यांना, रयतेला अशा प्रकारची प्रेरणा दिली की ते स्वराज्यासाठी आपलं सर्वस्व अर्पण करण्यास तयार झाले. अगदी याची सुरुवात आपल्याला बाल शिवबांनी रायरेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात आपल्या सवंगड्यांसह हिंदवी स्वराज्य निर्मितीची शपथ घेताना पासून, जावळीचे मोरे यांचा बंदोबस्त, अफजलखानाचा वध, पन्हाळ्याचा वेढा, गाजापूरची खिंड, शाहिस्तेखानाची फजिती, मुरारबाजींचा पराक्रम, पुरंदरचा तह, आग्र्याहून सुटका, राज्याभिषेक सोहळा, दक्षिण दिग्विजय मोहीम अशा तुम्हां आम्हां सर्वांना माहीत असलेल्या अनेक घटनांमध्ये ती प्रेरणा आपणास दिसते. या प्रेरणेचे वैशिष्ट्य हे आहे की महाराजांच्या मृत्यूनंतर सुद्धा दिल्लीचा मुघल बादशहा औरंगजेब आपल्या पाच लाख सैन्यासह स्वराज्य गिळंकृत करण्यासाठी महाराष्ट्रात ठाण मांडून बसला होता. 27 वर्षे मराठे झुंजत होते. पण औरंगजेबाला यश मिळाले नाही.

आज एक शिक्षक म्हणून मला पडणारा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अशी ती कोणती प्रेरणा होती की ज्यामुळे सर्व समाज महाराजांच्या पाठीशी उभा राहिला. त्या प्रेरणेचा शोध घेण्याची आवश्यकता वाटते. कारण समाज तोच आहे. पण शिवरायांच्या कालखंडातील समाजातील अनेक घटकांनी स्वराज्याप्रति दाखवलेली निष्ठा, शिवरायांपूर्वी किंवा त्या नंतरच्या त्याच समाजातील काही घटकांनी स्वराष्ट्राप्रती दाखवली नाही. स्वतःच्या राष्ट्राप्रति असलेली निष्ठा ही इतकी कशी काय बदलू शकते? आजचे आपले चित्र काय? आपण आपली प्रेरणास्थानेच विभागून टाकलेली दिसतात. ज्या छत्रपती शिवरायांनी सर्व समाज घटकांना प्रेरणा दिली, त्या प्रेरणेने मोठ्या प्रमाणात समाज एकत्र गुण्यागोविंदाने राहिला व स्वराज्य निर्मितीच्या कार्यात गुंफला गेला. अगदी अखंड राष्ट्राला माहीत असलेले महाराजांसोबत चे मावळे मग त्यात जीवा महाला, शिवा काशिद, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, तानाजी मालुसरे, मदारी मेहतर, फिरंगोजी नरसाळा, प्रतापराव गुजर, हिरोजी फर्जंद, रघुनाथ पंत हनुमंते, बहिर्जी नाईक अशी ही रत्ने वेगवेगळ्या जाती धर्माची होती. स्वराज्यात कधीही जाती-धर्मा च्या नावाने वाद-तंटे आपल्याला दिसून येत नाहीत . त्या छत्रपतींना आपण मराठ्यांचे किंवा हिंदुत्ववाद्यांचे नेते म्हणून संकुचित करून ठेवले. भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमतेच्या प्रचंड यातना स्वतः सहन करून सुद्धा संपूर्ण देशाला प्रज्ञा, प्रेम, समता, बंधुता, करुणेचाच वारसा दिला. राज्यघटनेचाही वारसा दिला व हिंदू कोड बिलाचाही वारसा दिला . त्याच बाबासाहेबांना आपण दलितांचे नेते म्हणून संकुचित करून ठेवले. ज्या महात्मा फुलेंनी सामाजिक समरसता व्हावी म्हणून आपले आयुष्य वेचले, मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली त्यांना आपण केवळ माळी समाजाचे नेते म्हणून संकुचित केले. तर भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ज्या लोकमान्य टिळकांना इतिहासाने गौरवले त्यांना फक्त चितपावन ब्राह्मणांचे नेते म्हणून संकुचित केले. राष्ट्रपिता महात्मा गांधींना तर फक्त कार्यालयातील भिंतीवर फोटोच्या रूपात ठेवले. राष्ट्रपुरुषांप्रती आमच्या मनातील ही भावना आम्हांला आज ज्या वळणावर घेऊन आली आहे त्याचाही खऱ्या अर्थाने अभ्यास करण्याची गरज आहे. आम्ही राष्ट्रपुरुषांची ओळख सुद्धा विविध रंगांनी करून ठेवली. कोणी भगवे, निळे, हिरवे, लाल. या रंगावरून सुद्धा आमच्यात दुरावा, भांडणं, द्वेष, मत्सर. कधी मिळणार आम्हाला आमची खरी प्रेरणास्थाने.

याशिवाय माझ्या मते जाज्वल्य राष्ट्रभिमानाची प्रेरणा नष्ट होण्यामध्ये ज्या अनेक गोष्टी कारणीभूत आहेत त्यामध्ये ब्रिटिशांनी या देशावर लादलेली व राबवलेली कारकून बनवणारी शिक्षण व्यवस्था व प्रशासन व्यवस्था, की ज्याचे आजही आपण कमी अधिक प्रमाणात गुलाम आहोत यासोबतच त्या आधीच्या कालखंडामध्ये झालेली परकीय आक्रमणे, त्यांनीही राबवलेली प्रशासन व्यवस्था या सगळ्यांचा परिपाक आज जाज्वल्य राष्ट्राभिमान, देशाभिमान निर्माण होण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे येथील काही नागरिकांमध्ये देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याच्या भावनेचा अभाव दिसून येतो. आज प्रत्येक भारतीयाने आपण निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला तरी देश आत्मनिर्भर व विकसित राष्ट्र



झाल्याशिवाय राहणार नाही यात यत्किंचितही शंका नाही. पण इथे अनेकांचा दृष्टिकोन झारीतील शुक्राचार्यांचा दिसतो. दिवसागणिक जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा या नावाने संकुचित होतांना दिसत आहे आणि त्याही पलीकडे जाऊन वैयक्तिक स्वातंत्र्याच्या व स्वार्थाच्या भावनेने स्वैराचार बोकाळत चालला आहे. सामाजिक समरसता वाढण्याऐवजी तिच्या विभाजनाकडे आपला प्रवास सुरू असल्याचे चित्र नाही म्हटले तरी दिसायला लागले. आजची आपली वास्तव गरज ओळखून वर्तन करणे आपल्याला नाहीच जमत.महाराजांनी शेतकऱ्यांना पेरणीसाठी धान्य, नांगर, बैल उपलब्ध करून दिले. स्वराज्यातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणली. त्यामुळे उत्पादन अनेक पटीने वाढले. शेतात तयार झालेल्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा निर्माण केल्या. त्यासाठी व्यापारी वर्गही निर्माण केला. कधीही वतने, जहागिरी दिली नाहीत. प्रत्येकाला काम उपलब्ध करून दिले व योग्य काम करणाऱ्या व्यक्तीचा योग्य गौरवही केला. त्याची अनेक उदाहरणे आपल्याला शिवचरित्रात मिळतात. थोडक्यात महाराजांनी जे प्रजाहित दक्षतेचे धोरण राबवले त्याचा आज विचार करण्याची आवश्यकता आहे. असे मला वाटते. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील भारताच्या राजकीय घडामोडींचा अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येईल, की भारताला स्वातंत्र्य देण्याच्या आधी इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिलने ब्रिटिश पार्लमेंट मध्ये भारताला स्वातंत्र्य देण्यासंदर्भात ज्या अर्थाचे विधान केले ते आज तंतोतंत खरे होताना दिसत आहे. ते असे म्हणाले होते, 'मुळात या देशातील लोकांची स्वातंत्र्य उपभोगण्याची क्षमता नाही, आज जर आपण यांना स्वातंत्र्य दिले तर अल्पावधीतच चोर, लुटारू, भ्रष्टाचारी अशा फुटकळ लोकांच्या हातात या देशाची सत्ता सूत्रे जातील व पुन्हा एकदा हा देश जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या नावाने तुकड्या तुकड्यात विभागला जाईल' अशा अर्थाचे चर्चिल यांचे विधान म्हणजे आपण काही प्रमाणात का असेना चर्चिल यांना एक द्रष्टा बनवून ठेवले'. हे चर्चिल यांचे यश की आपले अपयश याचा आपण सर्वांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताच्या स्वातंत्र्याबद्दल चर्चा होत असताना, आधी राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक स्वातंत्र्य यावर वाद निर्माण झाला होता. राजकीय स्वातंत्र्याची गोष्ट करतांना चर्चेत- 'आपण कोणाच्या स्वातंत्र्याबद्दल बोलत आहात, गेल्या कित्येक पिढ्यांपासून पाठीला झाडू व गळ्यात मडके लटकवलेला हा समाज, याशिवाय गावातील सार्वजनिक पानवठयावर घोड्या-गाढवांना पाणी पिण्यास परवानगी पण आम्हाला बंदी, आमची सावलीही चालत नसे, तेव्हा राजकीय स्वातंत्र्याचे राहू द्या आधी आपण सामाजिक स्वातंत्र्य मिळवू.' लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्यातील संघर्षास अशाच गोष्टी कारणीभूत होत्या.

1707 नंतर मराठा सत्ताधीश छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूळ उद्देशालाच विसरलेले दिसतात. उदाहरणार्थ दक्षिणेत निजामाचा व हैदरचा अनेक वेळेला पराभव केला पण त्यांना कायमच संपवलं नाही त्या निजामाचे अस्तित्व आजही आपल्याला विविध अंगांनी दिसून येते. दिल्लीत मुघलांचे साम्राज्य खिळ-खिळे झाले होते .बादशहा सुद्धा मराठ्यांच्या मर्जीतला असे. पण मराठ्यांना कधीही दिल्लीवर आपण बसावे असे वाटले नाही. अगदी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा चीनने आपल्यावर आक्रमण केले व आपला बराच मोठा भूप्रदेश गिळंकृत केला या उलट पाकिस्तानचा आपण चार वेळेला युद्धात पराभव केला पण सुईच्या टोकावर बसेल एवढी जमीन सुद्धा आपल्याला मिळाली नाही किंवा मिळवता आली नाही. थोडक्यात आपण पाकिस्तानला चार वेळेला युद्धात हरवलं पण तहात आपण हरलो. या प्रत्येक वेळी माझ्या मनाला सारखे वाटत राहते, आपण छत्रपतींच्या विचारांनाच विसरलो. कारण छत्रपतींनी जेवढे तह केले त्या प्रत्येक तहामध्ये आपलं कोणत्याही प्रकारे नुकसान होऊ नये याची काळजी घेतली. अगदी सखोल अभ्यास केला तर मिर्झाराजा जयसिंगाशी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केलेला पुरंदरचा तह सुद्धा अनेक दृष्टिकोनातून महाराजांच्या हिताचाच होता. इतिहास आपल्याला पुन्हा पुन्हा हेही सांगतो की परक्यांनी आपल्यावर विजय मिळवल्यानंतर त्यांनी आपली श्रद्धेय स्थानं व स्फूर्ती देणारी प्रतीके शक्य तेवढी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आपण मात्र विजय मिळवल्यानंतर अशा प्रकारे शत्रूची श्रद्धास्थानं किंवा प्रेरणा देणारी प्रतीके नष्ट केल्याची उदाहरणे दिसत नाही. याउलट आपण आक्रमणकारी प्रवृत्तींच्या श्रद्धा स्थानांची किंवा त्यांच्या स्फूर्ती स्थानांची जपणूक उत्तम प्रकारे करताना दिसतो. ज्या शिवाजी महाराजांनी आपल्या लोकोत्तर गुणांनी राज्य मिळवले ते राज्य चिरकाल का टिकले नाही याचे कारण हेच असावे की त्या राज्याचा अभिमान सर्वांना सारखाच नव्हता किंवा शासनकर्ते सुद्धा महाराजांच्या विचारांना विसरलेले दिसत होते. स्वतः छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी सुद्धा सामाजिक समरसता वाढावी म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श लोकांना आपल्या डोळ्यासमोर ठेवण्यास सांगितला. महाराजांच्या काळात ज्या प्रकारे अठरापगड समाज एकत्र गुण्यागोविंदाने राहत होता आज त्याचा स्वीकार करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. केव्हातरी जात, धर्म विरहित समाज रचना निर्माण करण्याकडे आपल्याला वळावेच लागेल. तसे न झाल्यास काय दिवस उगवेल याची कल्पनाच न केलेली बरी. महाराजांचा याही दृष्टीने विचार व्हावा अन्यथा शिवा काशिद, मुरारबाची देशपांडे, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, फिरंगोजी नरसाळा, इब्राहिम खान, जिवा महाला, मदारी मेहतर, प्रतापराव गुजर, बहिर्जी नाईक अशा असंख्य नरवीरांनी स्वराज्यासाठी आपले तन-मन-धन ज्या विचाराने बहाल केले. होते की तो विचार जात-धर्मा पलीकडचा होता. त्या विचारांचे आज देशहितासाठी पुनर्जीवन करण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा

प्रकृती विरुद्ध विकृती, स्वातंत्र्य विरुद्ध गुलामी,<br>
निरपेक्ष धर्मनिष्ठा विरुद्ध विकृत धर्मांधता

असा होता.समरस समाज निर्माण होण्यास उज्वल चारित्र्य असणारे शिवाजी महाराज हे आदर्श आहेत. प्रकृती, स्वातंत्र्य व निरपेक्ष धर्मनिष्ठा या मूल्यांसाठी आजही जे उभे आहेत, ते खरे शिवभक्त

विकृती च्या बाजूचे, लाचार, गुलाम आणि विकृत धर्मांध हे शिवद्रोही! निरपेक्ष धर्मनिष्ठा म्हणजे प्रत्येकास 'स्व' धर्म पालनाचे पूर्ण स्वातंत्र्य, मात्र अन्य धर्मियांचा छळ करणाऱ्या विकृती ला तलवारीचा तडाखा देण्याचे सामर्थ्य!

आज तुम्हीं-आम्हीं सर्वांनी आपण निवडलेल्या क्षेत्रात सर्वोत्तम काम करणे हाच एक शिवरायांचा मावळा म्हणून त्यांना केलेला मानाचा मुजरा असेल. त्या माध्यमातून देशाचेही भविष्य उज्ज्वल करण्यासाठीच्या महासागररुपी कार्यात आपल्यामुळे एका थेंबाची निश्चितच भर पडेल. अशा असंख्य थेंबानी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळेच हा भारत देश उद्या आत्मनिर्भर होऊन जगात विश्वगुरु होईल यात शंकाच नाही. कर्तव्यदक्ष माणसांमधूनच कामाला शिस्त येईल. प्रत्येकाने देशासाठी एकच केले पाहिजे, जे महात्मा गांधीजी म्हणत 'देशाच्या विकासासाठी जो बदल व्हावा असे तुम्हाला मनापासून वाटते, सर्वप्रथम तो बदल स्वतःमध्ये करा' आधी प्रत्येकाने आपल्या मनाच्या आत जडलेल्या जातीपाती संपवाव्यात, कारण हा देश पारतंत्र्यात जाण्यास त्याच गोष्टी कारणीभूत ठरलेल्या आहेत. कुठेही पचापचा थुंकू नये, सिग्नल स्वतः पळावेत, कर वेळेत भरावेत यासारख्या साध्या वाटणाऱ्या गोष्टी आपण नाही केल्या तर काहीच होणार नाही. 'मी माझे कर्तव्य नीट करणार आहे'. असे वर्तन करणारी जी थोडी माणसे या देशात आहेत, तीच देशाचे भवितव्य घडवतील. यावर माझा ठाम विश्वास आहे. एक भारतमातेचा पुत्र म्हणून, एक राष्ट्राभिमानी शिक्षक म्हणून मी माझ्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी 'सामाजिक समता आणि छत्रपती शिवराय' हा विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मित्रांनो या लेखामध्ये छत्रपतींच्या कालखंडात 18 पगड समाज एकत्र गुण्यागोविंदाने नांदत होता आज मात्र त्याच समाजाचे चित्र महाराजांच्या विचारापासून इतके भरकटलेले का वाटते याचे मंथन करण्याचा प्रयत्न माझ्या अभ्यासा नुसार केला आहे. तुम्हीं माझे विचार काळजीपूर्वक वाचले याबद्दल मी आपला ऋणी आहे. माझ्या लिखाणातली न्यूनाधिक्य पुरते-सरते करून घ्यावे व कमी अधिक तीव्र रचनेबद्दल माफ करावे. "फोडिले भांडार धन्याचा तो माल | मी तो केवळ हमाल भारवाही||" ही तुकोबारायांची उक्ती, तुम्हासारख्या जाणत्यांकडून खरे तर सगळे काही घेऊनच मी हे माझे म्हणून लिहितो. याबद्दलही माझ्या लिखाणाचा उदार मनाने स्विकार करावा.

लेखक प्रा.प्रशांत शिरुडे<br>
के.रा.कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली. मो.9967817876

# संसदेतील गोंधळ व निलंबन योग्य आहे का ?

आधुनिक केसरी




रमेश लांजेवार, नागपूर<br>
संपर्क क्र. 9921690779

लोकांच्या प्रश्नांपेक्षाभारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ व मंदिर समाजल्या जाणाऱ्या संसदेत अचानक घुसखोरी होवून संसदेत गोंधळ उडतो ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. आपल्या सर्वांनाच ग्यात आहे की 13 डिसेंबर 2001 ची दहशतवादी घटना देशासह जगाला हादरून देणारी होती ही बाब चांगल्याप्रकारे सरकारला माहित असतांना अशा चुका पुन्हा-पुन्हा का व्हाव्यात? असे अनेक प्रश्न देशापुढे, देशाच्या जनतेपुढे व सुरक्षेयंत्रणेपुढे उपस्थित रहातात.आपण 13 डिसेंबर 2001 मध्ये संसदेवर झालेल्या प्राणघातक दहशतवादी हल्ल्याच्या स्मरणदिनीच ही घटना का घडावी असाही प्रश्न उद्भवतो. अचानक सहा जणांनी नवीन संसद भवनाची सुरक्षा भेदल्याने 13 डिसेंबर 2023 बुधवारला देशभरात खळबळ उडालीच सोबतच याचे पडसाद जगातही दिसून आले.जे सहा युवक संसद भवनाच्या परिसरात किंवा आत गेले त्यांना कर्नाटकातील भाजपचे खासदार प्रताप सिम्हा यांच्या मार्फत पास दिल्याचे सांगितले जाते.प्रताप सिम्हा म्हणतात की आपण या तरूणानां ओळखत नव्हतो असे प्रताप सिम्हा म्हणतात.यामुळे प्रश्न उद्भवतो की आपण जर या युवकांना ओळखत नाही तर एवढ्या मोठ्या लोकशाहीच्या मंदिराच्या पास का देण्यात आल्या? त्यामुळे संसद भवनात किंवा परिसरात तरूणांमार्फत जेही घृणीत कृत्य घडले त्याचा पहिला दोषी पास देणारा खासदारच आहे असे मी समजतो. कारण खासदारांनी पास दिल्याच नसत्या तर असे कलंकित कृत्य घडलेच नसते. सोबतच यात सुरक्षा यंत्रणेची सुध्दा मोठी चूक दिसून येते.सुरक्षा यंत्रणेमार्फत जर त्या तरूणांची कसुन तपासणी झाली असती तर त्यांना जागीच पकडून कारवाई करता आली असती व हा अनुचित प्रकार टाळता आला असता.त्यामुळे संसद भवनाच्या परिसरात तरूणांमार्फत जेही घृणीत कृत्य झाले त्याचे मुख्य दोषी पास देणारे खासदारच आहे व नंतर सुरक्षा यंत्रणा आहे. त्यामुळे सरकारने पास देणाऱ्या खासदाराला ताबडतोब निलंबित करायला पाहिजे व जेलमध्ये टाकायला हवे सोबतच येणाऱ्या निवडणुकीत सुध्दा त्याला निवडणूक लढण्याचा अधिकार नसावा.कारण एका व्यक्तीमुळे देशांच्या आधारस्तंभावर असे घृणास्पद कृत्य घडले आहेत.अशा घटना देशाला काळीमा फासणाऱ्या असतात. त्यामुळे अशांवर वेळीच कठोर कारवाई व्हायला हवी.सुरक्षा यंत्रणा संसदभवनाच्या इंट्रीच्या गेटवर काय करीत होते असाही प्रश्न उपस्थित होतो? घुसखोरी करणारे युवक सहज पिवळ्या धुरांच्या नळकांड्या कशेकाय आत घेऊन गेलेत? सुरक्षा यंत्रणा व प्रशासन काय करीत होती? असे अनेक प्रश्न देशांच्या 140 कोटी जनतेसमोर उपस्थित रहातात. अशा घटना घडत राहिल्या तर देशाचे काय होणार असाही प्रश्न निर्माण होतो. संसदेसारख्या सुरक्षा कवचाला जर कोणी भेदत असेल तर देशासाठी व देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे.त्याचप्रमाणे अधिवेशन दरम्यान संसदेत गोंधळ घालने किंवा खासदारांचे निलंबन लोकशाहीसाठी कितपत योग्य आहे याचाही विचार लोकप्रतिनिधींनी व सरकारने करायला हवा.अधिवेशन दरम्यान सांसद देशाचे प्रतिनिधित्व करतात अशा परिस्थितीत संसदेत लोकप्रतिनिधींनी गोंधळ का घालावा? गोंधळ एवढा की 144 खासदार निलंबित होतात ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. यावरून स्पष्ट होते की विपक्ष-सत्तधारी पक्ष यांच्यात कुठेतरी ठिणगी उडत असावी. जेव्हा देशांच्या 140 कोटी जनतेचा विचार करतो तेव्हा संसदेत विपक्ष असने गरजेचे असते.विरोधक जोपर्यंत प्रश्न उपस्थित करणार नाही तोपर्यंत देशातील समस्या कशाकाय उजेडात येईल व तोडगा कसा काय निघेल आणि प्रश्नांची उत्तरे कसे काय मिळतील याचाही विचार सरकारने गांभीर्याने करायला हवा.संसदेत गदारोळापेक्षा चर्चा करने अत्यंत महत्त्वाचे आहे याची जाणीव पक्ष-विपक्षाच्या खासदारांनी ठेवायला पाहिजे. पक्ष-विपक्षाचे खासदार एखाद्या कार्यक्रमात जातात तेव्हा चांगले बोलतात व रहातात मग संसदेतच गोंधळ का घालावा? याचाही विचार करावा लागेल.लोकसभेतील निलंबन व गोंधळ यामुळे लोकशाहीला तडा जाऊ शकते याला नाकारता येत नाही.संसदेतील प्रत्येक खासदारांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की आपण वय्यक्तीक प्रतिनिधीत्व करीत नसुन देशाचे प्रतिनिधित्व करीत आहोत म्हणजेच 140 कोटी जनतेचे असे समजून संसदीय कामकाज घालायलाच पाहिजे.संसदेचा एक -एक मिनिट महत्वाचा असतो.कारण संसदीय अधिवेशनाच्या दरम्यान देशाचा करोडो रुपयांचा खर्च होतो व हा पैसा देशांच्या तळागाळातील जनतेच्या खिशातून जातो याची जाणीव पक्ष-विपक्ष यांनी ठेवली पाहिजे. अशा परिस्थितीत जर पक्ष-विपक्ष विधेयकावर चर्चा करत नसेल व फक्त गोंधळ घालत असेल तर ही बाब लोकशाहीला घातक आणि चिंताजनक आहे याची जाणीव खासदारांनी ठेवली पाहिजे.अधिवेशन जर सुरळीत चालवायचे असेल तर वेळ घालवीने,निलंबन, बहिष्कार, नारेबाजी,चक्कलसबाजी असे प्रकार खासदारांनी टाळले पाहिजेत.कारण संसदेचे कामकाज संपूर्ण देश पहात असतो व संसदेतुनच देशांच्या विकासाला चालना मिळते.त्यामुळे संपूर्ण खासदारांची वागणुक सभ्यतेची असावी.

# पत्रकारितेतील खरा पुरस्कार

आधुनिक केसरी

**निर्हेतुकपणे  कर्तव्य पार पाडत असताना एखादा प्रसंग असा घडावा आणि तो प्रसंग किंवा घटना तुमच्यासाठी सर्वाधिक मोठा पुरस्कार वाटावा असाच एक प्रसंग माझ्या आयुष्यात मला अनुभवायला मिळाला. पुरस्काराचा सर्वत्र बाजार भरलेला असतांना, तो मिळावा म्हणून एनकेंन प्रकारे प्रयत्न करणाऱ्यांची व स्वतःवरून आरती ओवाळून घेणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढलेली असतांना मी कधी पुरस्कारांच्या मागे लागलो नाही. लोकांच्या मनात आपले काय स्थान आहे हाच जगातला सगळ्यात मोठा पुरस्कार हे मानणारा मी एक सर्वसामान्य माणूस आहे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



कुठलेच काम मी कधी पुरस्कारांच्या हेतूने आजपावेतो केले नाही. पत्रकारीता आणि सामाजिक काम करत असतांना अनेक संस्थेने मला पुरस्कार दिले. कोणताच पुरस्कार कधी डोक्यात घुसू दिला नाही अथवा मिळालेल्या पुरस्कारांची कधी नोंद देखील ठेवली नाही. एव्हढेच काय आयुष्यात आजपर्यंत कुठल्याच पुरस्कारासाठी कधीच प्रस्ताव पाठवला नाही किंवा 'एक पुरस्कार द्या मज आणुनी' असा कधी गळा काढला नाही.  परंतु २५ वर्षाच्या पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करत असतांना अनुभवायला आलेला एक प्रसंग ज्यापुढे मला पत्रकारितेतील ,सामाजिक कार्यातील नामांकित पुरस्कार देखील थिटे पडतील असे महत्व माझ्या नजरेत त्या प्रसंगाचे आहे.

साधारणतः २००५ चा प्रसंग असावा. अंजनी खुर्द या गावी प्रवासी निवाऱ्यात एक वाहन जाऊन धडकले आणि त्यात त्या प्रवासी निवार्याची बरीच पडझड झाली.पण त्यापेक्षा त्या प्रवासी निवाऱ्यात गुडघ्यापासून दोन्हीही पाय नसलेला व्यक्ती होता,प्रवासी निवाऱ्यात गाडी येते आहे हे दिसत असतांना देखील दोन्हीही पायाने अधू असलेल्या त्या माणसाला कुठे धावून जाता देखील येत नव्हते परंतु त्या व्यक्तीला यत्किंचितही इजा झाली नाही. पायाला गँगरीन झाल्याने पाय कापल्या गेलेला तो इसम कोण,कुठला अशी मी मित्राकडे विचारणा केली आणि त्याचा जीवनपट च माझ्या समोर त्या निमित्ताने आला. मूळचा खळेगाव येथील रहिवासी असलेल्या त्या इसमाचे इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व. जागतिक कीर्तीच्या लोणार सरोवराचा तो गाईड होता.जगभरातून येणाऱ्या विदेशी पर्यटकांना तो लोणार सरोवराबाबतची वैज्ञानिक, तसेच पौराणिक माहिती सांगायचा. लोणार सरोवराचे महत्व उत्तम पद्धतीने तो विदेशी पर्यटकांना सांगायचा. परंतु पायाला इजा झाली त्यात गँगरीन झाला आणि दुर्दैवाने दोन्हीही पाय गुडघ्यापासून कापावे लागले. गाईड म्हणून काम करत असतांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा भास्कर बेरोजगार झाला आणि त्याच्या आयुष्याने वेगळीच कलाटणी घेतली. आयुष्यभर साथ देण्याची शपथ घेतलेल्या पत्नी ने आणि मुलाने त्याला वाऱ्यावर सोडले अन त्या भास्कर ला भीक मागण्याची दुर्दैवी वेळ नियतीने त्याच्यावर आणली.

त्याच्याच तोंडून हे सगळं ऐकल्यानंतर मी त्याच्या आयुष्यावरील वृत्त दै. देशोन्नती ला प्रसिद्ध केले. याला दोन-तीन वर्षांचा कालावधी निघून गेला. हाच भास्कर कडक उन्हाळ्यात मेहकर ला आला असता स्थानिक डॉ गाभने हॉस्पिटल समोर त्याचा निपचित पडलेला देह आढळून आला.उष्मांघाताने त्याचा मृत्यू झाला होता. मृत पावलेली व्यक्ती कोण म्हणून त्याची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी त्याच्या फाटक्या झोळीची झाडाझडती घेतली. पीएसआय गवई नामक अधिकाऱ्याला त्याच्या झोळीत पांढऱ्या प्लास्टिक च्या  थैलीला सुई दोऱ्याने शिवून त्यात टाकलेली , मी प्रसिद्ध केलेली बातमी दिसून आली. अर्थात हे त्याने केलेले लॅमीनेशनच होते. पोलिसांनी मला कॉल करून बोलावले.ती बातमी मला दाखवली,त्याचा निपचित पडलेला देह दाखवला. माझ्या डोळ्यात अश्रूंच्या धारा कारण तब्बल 2,3 वर्ष माझी बातमी त्याने जीवापाड जपली होती. आणि स्वकीयांनी ज्याला दूर केले होते,ओळख विसरले होते त्याची ओळख माझ्या त्या बातमीने सिद्ध केली होती.

माझ्या बातमीला तशा पद्धतीने शेवटच्या श्वासापर्यंत जपणे,सांभाळून ठेवणे

मला वाटतं पत्रकारितेतील मला त्याने दिलेला तो पुरस्कारच नव्हे का...?या पुरस्कारापुढे सगळे पुरस्कारच फिके पडणारे नाहीत का..?

# स्वाभिमानाने जगण्याची दृष्टिहीनांची धडपड!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**रेल्वे स्टेशन, बस स्टेशन व रेल्वे गाड्यांमध्ये अनेक अंध अपंग लोक स्वाभिमानाने छोटे छोटे व्यवसाय करून आपलं उदरनिर्वाह करत असतात. ..आपली कला सादर करून काही दृष्टिहीन व्यक्ती पोट भरण्यासाठी धडपड करीत आहेत. वर्धा नागपूर वर्धा भुसावळ किंवा इतर कोणत्याही रेल्वे गाड्यांमध्ये हे अंध अपंग लोक स्वाभिमानाने खेळणी, चिक्की ,लहान मुलांचे गेम्स, टूथब्रश, सोप पेपर विकून  आपला उदरनिर्वाह करतात.. त्यांच्याकडे बघितल्या नंतर जिवन जगण्याची त्यांच्या असलेली जिद्द व स्वाभिमान दिसून येतो. शहरांमध्ये किंवा गांवांमध्ये  मंदिर परिसरात. 'बाप्पा मोरया रे, बाप्पा मोरया रे', 'शिर्डीवाले साईबाबा', 'तूने मुझे बुलाया शेरोवालीये' अशा  प्रकारची व फिल्मी गाणी गा लोकांचे  मनोरंजन करतात.**

आजूबाजूचा  परिसरगाण्यांनीदुमदुमून जात असतो. रस्त्याच्या कडेला पदपथावर तिघे आपली कला सादर करतात. वाद्यवृंदाच्या साथीने गाणी गाऊन येणाऱ्या- जाणाऱ्यांचे मनोरंजन करतात. जे नागरिक स्वतःहून मदत करतील ती मदत स्वीकारतात. आपल्यासमोर हजारोंचा जनसमुदाय आपला श्रोतृवर्ग आहे, या आवेशात कुठलाही अभिनिवेश न ठेवता ते आपली कला सादर करताना तल्लीन होतात. अपंगत्व असणं ही केवळ मनाचे खेळ आहेत. अपंगत्व असल्याने कोणाची प्रगती थांबू शकत नाही. ज्याला खरंच प्रगती करायची आहे ती तो करतोच, हेच या महिलांनी सिद्ध केले आहे. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर काही अंधानीनी हे सिद्ध केले आहे की, अपंगत्व कधीही त्यांच्या मार्गात अडथळा ठरू शकत नाही.

नोकरी व्यवसाय आणि कामानिमित्ताने दररोज हजारो मुंबईकर दादर स्टेशनवरुन ये-जा करत असतात. यावेळी गडबडीत असणाऱ्या मुंबईकरांच्या कानावर पडतात ते सलीम शेखच्या बसरीतील मंजुळ स्वर. कितीही गडबड असली तरी आपले हात पाकिटामध्ये जाऊन त्यातले पाच, दहा रुपये मुंबईकर हळूच बाहेर काढतो आणि सलीमच्या खिशात ठेवून पुढे निघून जातो. सलीम मुंबईकरांना हवाहवासा वाटतो.दोन्ही डोळ्यांची दृष्टी नाही. मात्र, त्यांच्या मनाच्या मोठेपणाची व्याप्ती अफाट आहे. अंधांना शिक्षणासाठी किती हलाखीच्या परिस्थितीचा सामना करावा लागतो, ही बाब त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून कळली. म्हणूनच त्या दाम्पत्याने स्वतःच्या वेतनातून तब्बल २० मुलींच्या शिक्षणासह स्वतःच्या घरीच निवास भोजनाची व्यवस्था केली आहे. मागील नऊ वर्षांपासून त्यांची ही सेवा सुरू आहे. पंजाब राघोराव पाटील आणि मंदा पंजाबराव पाटील, असे या दाम्पत्याचे नाव आहे. पंजाबराव मंदाताई हेसुद्धा दृष्टिहीन आहेत. मात्र, या अपंगत्वावर मात करून दोघांनीही आपले शिक्षण पूर्ण केले. २००० मध्ये त्यांनी नोकरीसाठी नांदेड गाठले. त्या ठिकाणी एका शाळेवर दोघेही नोकरी करत होते. त्यांना महिन्याकाठी हजार रुपये मानधन मिळायचे. दोन वर्षे काम केल्यानंतरही त्या शाळेला अनुदान आल्यामुळे शाळा बंद पडली. आता जगायचे कसे? असा यक्षप्रश्न पाटील दाम्पत्यापुढे उभा ठाकला. मात्र, ते डगमगले नाहीत, पंजाबरावांनी अमरावती गाठले एमए बीएड पूर्ण केलेल्या तरुणाने परिस्थितीमुळे रेल्वेमधून खेळणी विकण्यास सुरुवात केली. जवळपास दोन वर्षे त्यांनी याच मार्गातून उदरनिर्वाह चालवला



होता. दरम्यान, शहरातील महिंद्र विद्यालयात त्यांना शिक्षक म्हणून नोकरी लागली. जगण्याचा प्रबळ आधार मिळाल्यामुळे ज्या अंध मुलींची शासकीय वसतिगृहात निवासाची व्यवस्था नाही, मात्र त्यांना शिकायचे तर आहे, अशा मुलींना घरीच आधार देण्याचा निर्णय घेतला. २००६ पासून त्यांनी अंध मुलींना आधार देण्यासाठी सुरुवात केली. पहिल्या वर्षी त्यांच्याकडे मुली होत्या. दरम्यान, २००९ मध्ये मंदाताईंनासुद्धा सर्व शिक्षा अभियानमध्ये कंत्राटी स्वरुपात नोकरी लागली. भाड्याच्या घरात राहणाऱ्या या दाम्पत्याने वडाळी परिसरातील देवीनगरमध्ये घर घेतले. त्या ठिकाणी तीन खोल्यांचे घर बांधले. त्यापैकी एक खोली मुलींसाठी दिली. सध्या पाटील यांच्या घरी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या २० मुली आहेत. या मुलींच्या शिक्षणासह त्यांना शाळेत पोहोचवणे, भोजनाची व्यवस्था आदी सर्व भार पाटील दाम्पत्यानी उचलला आहे. पंजाब पाटील यांनी अपंग एकात्मिक विकास शैक्षणिक बहुउद्देशीय संस्थेची स्थापना केली आहे, मात्र शासनाकडून अद्याप मदत झाली नसल्याचे पाटील दाम्पत्यांनी सांगितले.

अंध मुली मुलांना शासकीय निवासी शाळेत आठवीपर्यंत राहण्याची सोय आहे. मात्र, त्यानंतर त्यांनी शिक्षणासाठी कोठे राहायचे, हा प्रश्न आहे. शासनाने समाजकल्याणच्या वसतिगृहात अपंगांसाठी टक्के आरक्षण ठेवले आहे. या टक्के अपंगांमध्ये अंधांसह इतर अपंगांचाही समावेश होतो. त्यामुळे अतिशय कमी मुलींना वसतिगृहात संधी मिळते. अशा वेळी त्यांच्या शिक्षणात कोणतीही बाधा निर्माण होऊ नये, हा उद्देश पुढे ठेवून पाटील दाम्पत्याने हा वसा घेतला आहे.

# सतर्कता पाळा; कोरोना टाळा

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

ज्याने दोन वर्ष  लोकांना घरात कोंडून ठेवले, ज्याने जगाचे अर्थचक्र थांबवले, लाखो लोकांना बेरोजगार केले, ज्याने शाळेतील मुलांना शाळाबाह्य बनवले, ज्याने हजारो नव्हे तर लाखो जणांचा बळी घेतला तो पुन्हा येतोय. हो कोरोना पुन्हा येतोय. केवळ भारतातच नव्हे तर जगात कारोना पुन्हा हातपाय पसरत आहे. मागील काही दिवसात कोरोनाने जगात पुन्हा एकदा दमदार एंट्री केल्याने जगाची चिंता पुन्हा वाढली आहे. कोरोनाचा नवा व्हेरियंट जेएन 1 ने  भारतासह जगातील ४० देशात शिरकाव केला आहे. भारतातही या नव्या व्हेरीयंटने शिरकाव केला असून या व्हेरीयंटचा पहिला रुग्ण ८ डिसेंबरला केरळात सापडला होता. त्यानंतर तामिळनाडू, आंध्रप्रदेश, दिल्ली अशा सर्वच राज्यात या व्हेरीयंटचे रुग्ण आढळून येऊ लागले. १७ डिसेंबरला तामिळनाडूत एकाच दिवशी पाच रुग्ण दगावल्याची बातमी आली प्रशासनाची चिंता वाढली. केंद्र सरकारने तातडीने सर्व राज्यातील आरोग्यमंत्र्यांची व सचिवांची बैठक घेतली . महाराष्ट्रातही या व्हेरीयंटने शिरकाव केला आहे. सिंधुदुर्ग, मुंबई करत आता हा व्हेरीयंट ग्रामीण भागातही पसरला आहे त्यामुळेच सरकार ॲक्शन मोडवर आली. राज्य सरकारने तातडीने पावले उचलली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेत त्यांना सूचना केल्या. आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनीही खबरदारीच्या सूचना देत नागरिकांना भीती नको पण सतर्कता पाळा असे आव्हान केले. आरोग्य यंत्रणेने आणीबाणीच्या काळात कसलीही त्रुटी राहू नये याची काळजी घेतली. शासन आणि प्रशासन या नव्या व्हेरिअंटशी लढण्यासाठी सज्ज आहे ही समाधानाची बाब असली तरी राज्यातील नागरिकांनीही स्वतःची जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. हा नवा व्हेरीअंट  घातक नाही असेही आरोग्य विभागाकडून जाहीर करण्यात आले. मागील वर्षी देखील हिवाळ्यातच कोरोनाचा ओमायक्रोन हा व्हेरीअंट



आला होता. तेंव्हा देखील अशीच भीती जगात पसरली होती तेंव्हा तर कोरोनाची चौथी लाट येईल असा अंदाज वर्तवण्यात आला होता मात्र तो अंदाज फोल ठरला. आताही घाबरण्याचे कारण नाही मात्र योग्य ती खबरदारी घ्यावीच लागेल. कोरोना काळात नागरिकांना ज्या मार्गदर्शक सूचना सरकारकडून देण्यात आल्या होत्या त्याचे नागरिकांनी  काटेकोरपणे पालन करावे. गर्दीत जाणे टाळावे. गर्दीत जावेच लागणार असेल तर मास्क घालूनच जावे. सॅनिटायजरचा वेळोवेळी वापर करावा. नाताळ, नववर्षाच्या पार्श्वभूमीवर या बाबी कटाक्षाने पाळाव्यात. आपल्या देशात जवळपास ९० टक्के लोकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. वर्धक मात्रा ( बूस्टर डोस ) घेणाऱ्यांची संख्याही अधिक आहे त्यामुळे आपल्याकडे कोरोनाचा धोका इतर देशांच्या मानाने कमी आहे तरीही सतर्कता हवीच. मागील वर्षी ओमायक्रोन, यावर्षी जेएन 1 अशा नव्या उपप्रकारात कोरोना पुनरागमन करतच आहे याचाच अर्थ करोना जगातून हद्दपार झालेला नाही. कोरोना मुळासकट का हद्दपार होत नाही याचे उत्तर वैद्यक शास्त्राकडे देखील नाही. कोरोनाच्या उत्पत्ती बद्दलही अनभिज्ञता आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते कोरोना पृथ्वीवरून हद्दपार होणे अशक्य आहे तो नव्या रूपात येतच राहणार आहे त्यामुळे आपल्याला त्याचा मुकाबला करायचा असेल तर अत्याधुनिक पद्धतीनेच करावा लागेल शिवाय कोरोनाशी लढण्यासाठी जी त्रिसूत्री दिली आहे तिचे पालन करावे लागणार आहे. कोरोनाशी लढायचे असेल तर आता सतर्कता बाळगणे हाच उपाय आहे. भीती नको पण सतर्कता पाळा, कोरोना टाळा हा नवा मंत्र सर्वांनी अंगिकारला पाहिजे.

# विश्वास व भावना



डॉ.बलराज पांडवे
मो.नं. 9511885093

आधुनिक केसरी

**"विश्वासाचा पक्षी एकदा उडाला की पुन्हा त्या घरट्यात कधीच येत नाही" म्हणून विश्वास एक मनाचं नातं आहे .अंतरीक भावनेच्या पंखावर नेहमी उडत असते. जीवनात माणसाला अनेक गोष्टींचे चांगले आणि वाईट अनुभव मिळत असतात .जीवनाच्या पटलावर त्याची गोंदल्या प्रमाणे घट्ट प्रतिमा तयार होते. त्यातूनच आयुष्याचे विश्व तयार होते. त्या विश्वात अगं तूज गोष्टींना उगीच भावनेशी जोडले जाते .ज्याचे वर्णन व दर्शन करता येत नाही फक्त त्याची जाणीव होऊ शकते. परंतु अनुभव कथन करता येत. भावना ह्या कधीकधी निशब्द असतात. कधी व्यक्त होतात तर कधी व्यक्त होत नाहीत .परंतु त्याची जाणीव व अनुभूती होत असते.**

भावनेचे बंध रेशमी धाग्यांनी हृदयाशी जोडली जातात आणि विश्वासाच्या सागरात निरंतर तरंगत असतात. विश्वासाचे पंख घेऊन तो पक्षी आकाशी झेप घेत असतो व स्वच्छंद विहरत असतो. भावनेच्या दुनियेमध्ये जगण्याचा प्रयत्न करत असतो.आणि त्याला ते विश्व वास्तविक व खरे आहे असे वाटते....! बऱ्याच वेळा भावना जाणून घेण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो .परंतु भावना व्यक्त करणे खूप अवघड असते त्याची फक्त जाणीव व अनुभूती होऊ शकते. विश्वासाच्या घट्ट भिंतीने भावनेचे मंदिर उभारणे यालाच तर जीवन म्हणतात. जीवनाचे अनेक पैलू भावनेशी जोडलेले असतात. आणि विश्वासाच्या जोरावर पंखांना बळं मिळते व मिळालेल्या बळाच्या शक्तीवर माणूस उंच झेप घेत असतो . जगायचे म्हणून जगणे यापेक्षा विविध पैलू घेऊन जीवन पटलावर नटसम्राट होऊन जगणे यालाच तर जीवनाचे सार्थक झाले असे म्हणतात..

राग, लोभ, द्वेष ,मद, मत्स, अहंकार ह्या गोष्टी भावनेला व विश्वासाला मारक ठरतात. आपली दुनिया ,आपली माणसं, आपली नाती ,आपले विश्व प्रत्येकाने जिवापाड जपणे आवश्यक आहे .एखादा पक्षी आकाशी उंच भरारी घेऊन स्वच्छंद उडत असतो. मात्र जेव्हा तो परत येतो तो आपल्या इलाशा घरट्यातच!

कळत नकळतआयुष्याच्या वळणावरती अत्यंत सुखद अविस्मरणीय क्षण मिळतात .सदा सर्वदा आठवणीत राहतात .हृदयाच्या कोपऱ्यात स्वतःचे उत्तम स्थान निर्माण करतात .असे आनंदी व अतुल अतुलनीय क्षण.... एक जीवनाची शिदोरी आहे... जेव्हा जेव्हा मन उदास होते ....तेव्हा त्या शिदोरीत बांधून ठेवलेले व जतन करून ठेवलेले सुखाचे क्षण म्हणजे जिवनास मिळणारी प्रेरणा आहे. एक प्रकारची जगण्याची उर्मी आहे ,एक प्रकारचा उत्साह आहे, तो एक आनंद आहे, विलक्षण गती आहे ,आयुष्याची जीवनरेखा आहे ,जीवनात दरवळणाऱ्या सुगंधी गंध आहे .ते एक आयुष्याचे मांडलेले गणित आहे.

आनंदी क्षण जीवनात येणे, आपल्याशी एकजीव होणे, प्रयत्नांना प्रोत्साहित करून माणसाला सत्कर्म करण्यास प्रवृत्त करणे आणि अंतकरणात नेहमी आशा जिवंत ठेवणे या गोष्टी नेहमी भाग्यवंताच्या पदरी पडत असतात. या गोष्टींना जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या गोष्टी जिवापाड जपावे. आठवणीची वाट करून कर्माच्या मार्गावर एखाद्या पथीकासारखे चालत जावे .जीवनात कधीही न डगमगता मार्गक्रम चालू ठेवावे. मिळणाऱ्या आनंदी क्षणात रममान



होऊन आयुष्यात विविध रंग भरण्याचा प्रयत्न करावा. नाहक कुणास वेदना होतील असे करू नये .नाहक कुणाच्या जीवनाच्या रंगीन चित्रात आपले बेरंग टाकून चित्र विद्रुप करण्याचा प्रयत्न करू नये. मिळणारे आनंदी क्षण अचूक लूटणे हेच जीवनमूल्य आहे .आत्मविश्वासाने केलेली वाटचाल कधीही आपल्याला विचलित करत नाही. जसे की हंस पक्षी दूध पीत असताना दुधातील पाणी बाजूला सारून फक्त दूधच जसे प्राशन करतो. तद्वतचआयुष्यातील चांगल्या वाईट घटना कडे पाहतांना जे चांगले आहे तेवढेच घ्यावे जे वाईट आहे ते सोडून द्यावे. कोण आपले ,कोण परके यात न पडता आपल्या जीवन प्रवासातील मिळालेले अमूल्य घटक समजून त्यांचं स्वागतच करावे .भावना व विश्वास आपल्या विचारावर आधारित एक विचाराचे मंथन आहे .मानले तर मनाचे तरंग आहेत .या दोन गोष्टी ज्यांना सांभाळणे शक्य होईल ती व्यक्ती एक उत्तम व्यक्ती म्हणून ठरू शकते .म्हणून जेथे विश्वास आहे तेथे भावनाची कदर आहे, तेथे आदर आहे. म्हणूनच भावना जपणे ,भावना जाणून घेणे, आणि त्या भावनेच्या विश्वासात जगणे, यातूनच एक नवीन पर्व तयार होते. विश्वासाने उभारलेले व भावनेने रेखाटलेले एक सुंदर स्वप्न शिल्प होऊ शकते. जीवन पटलावर गोंदलेल्या अनेक क्षणाचे साक्षीदार होऊन आयुष्याची सुंदर बाग फुलवू शकते.. त्या बागेत फुलणारे रंगीबेरंगी फुलं, त्या बागेत भ्रमण करणारी पाखरं, त्या बागेत वाटणारी प्रसन्नता ,मनाला निश्चितच मोहित करते. म्हणून जीवनाच्या पटलावरती आपले नाव गोंदले गेले पाहिजे.जीवनाच्या पटलावर नटसम्राट सारखे आपण स्टेजवर उभे राहावे आणि संपूर्ण थियटर मध्ये टाळ्यांचा कडकडाट व्हावा. हेच तर मानवी जीवनाचे मूल्य आहे .या जगात प्रत्येक व्यक्ती येतो आणि जातो पण त्यांनी केलेल्या काही चांगल्या गोष्टींच्या पाऊलखुणा इतर लोकांना प्रेरणा देउन त्यांच्या जीवनामध्ये उर्मी व उत्साह निर्माण करू शकतात. अशा पाऊलखुणांचा आदर्श घेवून जिवापाड जपणूक करावी.जीवनाचा सारं समजून आत्मसात करणे कधीही हितकारकच आहे....!

# सन्मानाने जीवन जगण्यासाठी...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**सन्मान हा मागितल्याने मिळत नाही.सन्मान हा सहजासहजी मिळत नाही.सन्मान मिळतो व्यक्तीच्या असामान्य कामगिरीला, सन्मान होतो कर्तृत्ववान लोकांचा, सन्मान केला जातो गुणवान, चारित्र्यवान आणि प्रज्ञावान लोकांचा.जो व्यक्ती आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतो,इतरांच्या मदतीला धावून जातो,आपल्या कामात व पेशात कुचराई करीत नाही अशा व्यक्तींना समाज डोक्यावर घेतो.आणि जे लोक कर्तव्यात कसूर करतात,जे लोक अमंगळ विचारांचे असतात आणि आपण फार काम करतो असा आव आणतात अशा लोकांकडे समाज ढुंकूनही बघत नाही. आपल्या महामानवांनी केवळ आणि केवळ समस्त मानव जातीच्या उद्धारासाठी आणि उन्नतीसाठी कार्य केले.समाजात व देशात सुविचारांची पेरणी केली.**

समाजातील अनिष्ठ रुढी व वाईट परंपरा मोडीत काढून समता,बंधुता व मानवता ही मुल्ये रुजवली. म्हणून आपण आपल्या महापुरुषांची जयंती साजरी करतो. त्यांच्या कार्यांचा व विचारांचा आपण गौरव व सन्मान करतो. महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजकार्य करणारे लोक आजही आपल्या समाजात आहेत. आपल्या अवतीभवती काही सामान्यातील असामान्य लोक असतात जे आपले कार्य व पेशा निष्ठेने सांभाळून समाजाच्या हितासाठी ते असे काही अलौकिक कार्य करतात जे इतरांना अचंभित करणारे असते. अशा लोकांचा सन्मान समाज करत असतो. मदर तेरेसा यांनी जीवनभर कुष्टरोग्यांची सेवा केली. बाबा आमटे व मंदाकिनी आमटे या उभयतांनी गडचिरोलीच्या जंगलातील आदिवासींच्या कल्याणासाठी जीवन अर्पण केले. म्हणून तर यांच्यासाठी आपल्या जनतेच्या मनात नेहमीच आदराचे स्थान आहे. माझ्या उमरगा कोर्ट गावाचे भूमिपुत्र स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे यांनी आम्ही लहान होतो तेव्हा गावातील तीव्र स्वरूपाच्या जातीयतेला नष्ट केले. दरवर्षी साजरी होणाऱ्या आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमात शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन आम्हाला उच्च शिक्षण शिकण्यासाठी प्रेरीत केले.विज्ञान विषयाचे आदर्श शिक्षक व ज्यांचे वक्तृत्व अतिशय श्रवणीय व काळजाला भिडणारे होते अशा गणेशराव गुळवे गुरुजी यांनी शिक्षक या नात्याने त्यांच्या गावात व पंचक्रोशीत समाजहिताची कामे केली. बंकटराव गरड सरांनी सेवानिवृत्त झाल्यावर लातूरात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाचे मोफत क्लास घेतले.करिअर निवडण्यासाठी ते विद्यार्थ्यांना योग्य तेच मार्गदर्शन करतात. म्हणून आजही यांचे आमच्या हृदयात आदराचे व सन्मानाचे स्थान कायम टिकून आहे.

आजकाल असे दिसते की माणसांमध्ये गुणवान,चांगले व मानवतावादी बनण्याची इच्छा राहिली नाही.कारण समाजात डोकावून पाहिले तर असे लक्षात येते की श्रीमंत होण्यासाठी आणि जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल यासाठी माणसांची स्पर्धा सुरु आहे.झटपट श्रीमंत होण्याच्या मोहापायी माणूस स्वतःचे माणूसपण हरवून बसला आहे. काही नोकरदार लोक त्यांची नोकरी इमानदारीने करताना दिसत नाहीत.काही राजकारणी जनतेच्या हितासाठी कधी विकासाची कामे करत नाहीत.मग अशा लोकांना समाजात आदर व सन्मान कसा काय मिळेल? परंतु, आजकाल काही राजकीय व खाजगी संघटना ह्या पुरस्कार वाटपाचे काम करतात.अमुक एवढे पैसे भरा आणि आमच्या संस्थेचा पुरस्कार मिळवा अशा जाहिराती देऊन पुरस्कार दिले जात आहेत. मग काय हौशी लोक पुढे सरसावतात, पैसे भरतात आणि मिळालेला पुरस्कार मिरवत हिंडतात.या पुरस्काराने तुम्हाला क्षणिक आनंद मिळतो पण त्याचवेळी सूज्ञ व समजदार समाज तुम्हाला हसतो.हे काही लक्षात येत नाही. तेव्हा तुम्हाला समाजाकडून खराखुरा सन्मान मिळवायचा असेल तर तुम्हाला समाजहिताची कामे करावी लागतील.किमान तुम्ही तुमची नोकरी इमानदारीने केली, शिक्षकांनी प्रामाणिकपणे शिकवले, सर्व नोकरदार वर्गाने वेळेचे बंधन पाळले,गरजू व होतकरू लोकांना अडचणीच्या वेळी मदत केली की तुमचा सन्मान आपोआप वाढत जातो.खोटे नाटक करून,प्रतिष्ठेचा आव आणून सन्मान मिळत नसतो हे लक्षात घेतले पाहिजे.

# केंद्राने जाहीर केलेला हमीभाव तोकडा; राज्य सरकारने शेतकऱ्यांना बोनस द्यावा

## शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सततचा दुष्काळामुळे व अवकाळी शेतकऱ्यांची खरीप हंगामातील संपूर्ण पिके वाया गेले आहे तसेच रब्बी हंगामहि पूर्णपणे संकटात आहे शेतकऱ्यांनी पीक कर्ज व हात ऊसनावर घेऊन लागवड केली होती परंतु दुष्काळामुळे अवकाळी शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक वाया गेले. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ झालेली आहे परंतु केंद्र शासनाने जाहीर केलेला धानाचा हमीभाव उत्पादन खर्च भरून निघण्यालायक नाही, करिता महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना बोनस द्यावा अशी मागणी शेतकरी संघटना याच्या वतीने नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनात उचलून धरण्याची विनंती माननीय विरोधी पक्षनेते आमदार विजय भाऊ वडेट्टीवार यांच्याकडे करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा झालेली असून ते सोमवारीच अधिवेशनाचे कामकाज सुरु होताच बोलाची मागणी करणार असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत भाजप प्रणित सरकार उदासी नसून





जनसामान्यांच्या समस्याकडे लक्ष देत नाही. तरीपण बोलत ची मागणी सतत करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जर शासनाने शेतकऱ्यांना बोनस रुपी काही रक्कम जाहीर केली नाही तर शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची शासनाने दखल घ्यावी नसता शेतकरी रस्त्या वर उतरलया शिवाय राहणार नाही तरी आपण शासनाला सदर निवेदन सादर करावे अशी शेतकरी संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव अशी प्रतिक्रिया दैनिक आधुनिक केसरी प्रतिनिधीस दिली.

# सोनार समाजाने पारंपरिक व्यवसायाला कलात्मकतेची जोड द्यावी : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे. या सतांनी आम्हांस दया, क्षमा व शांतीची शिकवण दिली या संताच्या मांदीयाळीत संत श्री नरहरी महाराज यांचीही महती फार मोठी आहे. त्यांची शिकवण व अभंग हे सर्व समाजाला सदैव प्रेरणादायी ठरले.. महाराजांच्या जिवनचरित्रावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रपटाची निर्मिती होत आहे याचा विशेष आनंद असून याद्वारे नक्कीच भावी पिढीला संस्कारक्षम बनविण्यास मदत मिळेल असा विश्वास राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी व्यक्त केला.

स्थानिक प्रियदर्शिनी सभागृह येथे दि. 24 डिसेंबर रोजी आयोजित खुशी प्रॉडक्शन निर्मित 'कटीबंध संत नरहरी महाराज' या चित्रपटाच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर आ. किशोर जोरगेवार, चित्रपटाचे निर्माते संजय जाधव, गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट सदस्य किरण गजपूरे, माजी जि.प. सदस्य संजय गजपूरे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग अध्यक्षांचे अतिरीक्त खाजगी सचिव रवि चावरे, सोनार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रफुल चावरे, कोषाध्यक्ष सुमेध कोसुलकर, ॲड. प्रशिक ताठे, विनोद पांढरे, सुभाषराव रोकडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सोनार समाज हा कौशल्यप्राप्त समाज असून त्यांनी आपल्या पारंपारिक व्यवसायास अधिक वृध्दिंगत करावे. पवित्र मंदीरावरील कळस हे सोनार समाज घडवित असतो याचे महत्व लक्षात घेवून सुवर्णकामाचा वाव समाजात वाढत असतांना समाजातील सर्व युवकांनी या कौशल्याकडे विषेश लक्ष द्यावे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी



पारंपारिक व्यवसायास जोड देण्याकरिता विश्वकर्मा योजनेची सुरूवात केली असल्याने या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन हंसराज अहीर यांनी यावेळी केले.

संत नरहरी महाराजांचे विचार सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी समाजातील शिक्षितांनी प्रयत्न करावे. या समाजातील युवकांना शिक्षणाबरोबरच आपल्या पारंपारिक व्यवसायातील कलात्मकतेला नवा आयाम देत आपली कला जोपासावी असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी आ. किशोर जोरगेवार व अन्य अतिथींनी समायोचीत विचार व्यक्त केले. कार्यकमाचे प्रास्ताविक संजय गजपूरे यांनी तर संचालन सुमेध कोसुलकर यांनी केले.



# राष्ट्रीय शिक्षण धोरण बहुजनांना गुलाम करणारे

## माधुरी बृजभूषण यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रीय शिक्षण धोरणाची पोलखोल करण्यासाठी संत रविदास गार्डन येथे शिक्षण बचाव परिषद आयोजित करण्यात आली असून परिषदेचे उद्घाटन मध्यप्रदेशातील जागृत आदिवासी महिला संघटनेच्या नेत्या माधुरी ब्रिजभूषण यांचे हस्ते मनुस्मृतीचे दहन करून करण्यात आली. डॉ.उमेश बगाडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या उद्घाटन सत्रात रमेश बिजेकर, कॉ.किशोर जाधव उपस्थित होते. माधुरी यांनी आपल्या उद्घाटकिय मनोगतात केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणावर कडाक्याची टीका केली.राष्ट्रीय शिक्षण धोरण हे देशातील बहुजन कष्टकरी समूहाला गुलाम करणारे असून हे धोरण म्हणजे एकीकडे भारतीय ज्ञान प्रणालीच्या चौकटीत ब्राह्मणी विचार, कल्पना, मूल्य रुजवणाऱ्या नवीन अभ्यासक्रमाची प्रस्थापना करणे तर दुसऱ्या अंगाने बहुविद्याशाखीय शिक्षण एकूणच ब्राह्मणी -भांडवली अर्थव्यवस्थेची जोडणे असा आहे. हे धोरण जरी कौशल्य विकास आणि व्यवसाय यावर भर देत असले तरी निव्वळ कुशल मजूर निर्मितीचे साध्य ठेवणारे आहे जात ,वर्ग लिंगभेद अशा असमानतेच्या श्रेणीबद्ध भारतीय समाज रचनेत दीर्घ काळापासून ज्ञानबंदी लाभलेली आहे तसेच हीन ,अपवित्र ठरवलेल्या शारीरिक श्रमाची सक्ती केलेल्या स्त्रिया आणि शेतकरी, कारू नारू जाती पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य ,भटक्या व आदिवासी जमाती अशा बहुसंख्य जनसमुहाच्या शैक्षणिक विकासासाठी राज्यघटनात्मक तसेच समाज वास्तवदर्शी निकष या धोरणाने स्वीकारलेलं नाही त्यामुळे हे धोरण देशातील बहुसंख्यांक दलित आदिवासी कष्टकरी शेतकरी जातींच्या विरोधात असल्याचे प्रतिपादन केले.रमेश बिजेकर यांच्या बीजभाषणनंतर डॉ.उमेश बगाडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्वाला मोरे यांनी केले तर आभार राहुल कदम यांनी मानले.

# बाजार सावंगी व बोडखा येथे क्रीडा स्पर्धा; नागरिकांचा मोठा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज


**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद उच्च कन्या केंद्रीय शाळा व बोडखा येथील कैलास महाविद्यालयात ग्रामीण क्रीडा स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.

बाजार सावंगी जिल्हा परिषद उच्च कन्या केंद्रीय शाळेत शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रमेश नलावडे यांनी उदघाटन केले तर बोडखा कैलास महाविद्यालयात गटशिक्षण अधिकारी विलास केवट यांनी उदघाटन केले. ग्रामीण केंद्रीय स्तरी क्रीडा स्पर्धेत कबड्डी, धावणे, रस्सीखेच, भेलाफेक, गोळाफेक ,चमचा लिंबू आदि विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.या खेळ स्पर्धात मोठ्या उत्साहाने पालक नागरिकांनी सहभाग घेत विविध खेळ आवडीने खेळून उत्साह निर्माण केला यात पालक व नागरिकांना खेळताना विद्यार्थ्यांनी मोठी (चेअरिंग) प्रतिसाद दिला त्यामुळे खेळ स्पर्धेत दुगिणीत उत्साह वाढला अनेक बक्षिस ही नागरिक महिलांनी जिंकले या प्रसंगी मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक पदाधिकारी शिक्षण प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'शब्दवेध बुक हाऊस' पुरस्काराची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने २०२४ सालापासून 'लोकपत्रकारिता आणि समाजशिक्षक' असे दोन पुरस्कार देण्यात येणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंपर्क विभागाचे माजी प्रमुख प्रा. सुरेश पुरी यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'प्रा. सुरेश पुरी लोकपत्रकारिता पुरस्कार' तर माजी सैनिक स्मृतिशेष 'प्रा. विठ्ठल गोरे समाजशिक्षक'





पुरस्कार देण्यात येणार आहे. या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम पाच हजार रुपये, मानचिन्ह असे असेल. लवकर पुरस्कारार्थीचे नाव जाहीर करण्यात येणार आहेत.

# ओझर दहावा मैल परिसरात देशी बनावटीचे दोन पिस्टल व चार जिवंत काडतुसे जप्त

## नाशिक ग्रामीण पोलिसांच्या विशेष पथकाची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** आगामी नववर्ष व दि.३१ डिसेंबर २०२३ च्या पार्श्वभुमीवर नाशिक जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांचे आदेशान्वये ग्रामीण पोलीसांनी अवैध शस्त्रे विरोधी मोहिम हाती घेतली आहे.

त्या अनुषंगाने दि.२४ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळालेल्या गुप्त बातमीनूसार मालेगाव शहरातून एका टॅक्सीमध्ये काही संशयीत घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगून नाशिकच्या दिशेने येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ओझर दहावा मैल परिसरात सापळा रचून संशयीत टॅक्सी क्र. एम.एच.१५.जी.व्ही. २७५८ हे वाहन अडवून, वाहनातील संशयीत मोहम्मद आरिफ मोहम्मद फारूख, वय ३६, रा. रजियाबाद, मालेगाव, ता. मालेगाव याची झडती घेतली असता, त्याचे कब्जात एका बॅगमध्ये देशी बनावटीचे दोन पिस्टल व चार जिवंत काडतूसे मिळून आली. सदर इसम हा विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळून आला असून त्याचेविरूध्द ओझर पोलीस ठाणे येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप व अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तसेच विशेष पथकातील पो.नि.संजय गायकवाड, स.पो.उ.नि दिपक आहिरे, शांताराम नाठे, पो.हवा सचिन धारणकर, चेतन संवत्सरकर, पो.कॉ विनोद टिळे, गिरीष बागुल यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.




> आगामी नववर्ष व दि .३१ डिसेंबर २०२३ च्या पार्श्वभूमीवर अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांविरूध्द वरील प्रमाणे कारवाई करण्यात येणार असून कोणीही इसम अवैध शस्त्रे बाळगून गुन्हेगारी कारवाया तसेच दहशत निर्माण करीत असेल तर नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे अवैध व्यवसायविरोधी हेल्पलाईन क्रमांक ६२६२२५६३६३ यावर संपर्क करावा .
>
> **– शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक, नाशिक**



# करणी सेनेच्या भोकर तालुकाध्यक्षपदी चौहान तर महामंत्रीपदी मानसिंह तौर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** करणी सेनेच्या भोकर तालुकाध्यक्षपदी विक्रमसिंह चौहान तर तालुका महामंत्री म्हणून मानसिंह तौर यांची निवड करण्यात आली.

शहरातील माऊली मंगल कार्यालयात तालुक्यातील राजपूत बांधवांची बैठक घेण्यात आली.या बैठकीस जिल्हाध्यक्ष शैलेंद्रसिंह ठाकुर, प्रमोद ठाकुर, भोकर पत्रकार संघाचे सचिव मनोजसिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी करणी सेना राष्ट्रीय अध्यक्ष सुरजपाल अम्मुजी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष देवीचद बारवाल यांच्या मार्गदर्शनानुसार करणी सेनेचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्रसिंह ठाकूर यांनी भोकर तालुका कार्यकारणी जाहीर केली .यात तालुकाध्यक्ष म्हणून विक्रमसिंह चौहान, तालुका महामंत्री मानसिंह तौर, उपाध्यक्ष राजपाल भिमसिंह चौहान तर राजेश चंदेल, मोहनसिंह चौहान, यशपाल रघुवंशी, संतोषसिंह ठाकूर, महेश ठाकूर, कृष्णा ठाकूर, राज ठाकुर तरूण राजपूत बांधवांची विविध पदावर नेमणूक करण्यात आली आहे. मानसिंह तौर यांनी सूत्रसंचलन करून आभार मानले. बैठकीस राजपूत बांधवांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

जिल्हाध्यक्ष शैलेंद्रसिंह ठाकुर म्हणाले की, राजपूत बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि संघटनेच्या माध्यमातून राजपूत बांधवांना एकत्र आणण्यासाठी प्रत्येक गावात जाऊन संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहोत.समाजात आर्थिक परिस्थितीने कुमकुमवत असलेल्या बांधवांना व्यवसाय करण्यासाठी आणि शैक्षणिक क्षेत्रात अडचणी निर्माण झालेल्या राजपूत समाजाच्या विद्यार्थ्यांना आमच्याकडून मदत करण्याची ग्वाही दिली .करणी सेनेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी नव्या जोमाने काम करून संघटन वाढविण्याचे आव्हान त्यांनी केले आहे.

# खुलताबाद येथे नाईट क्रिकेट स्पर्धेचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजारपेठ येथे चाललेल्या रात्र क्रिकेट स्पर्धेचा चित्तथरारक सामन्याद्वारे समारोप व बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी आशिष कुलकर्णी प्रथम पारितोषिक, दिनेश कायस्थ द्वितीय व दिनेश सावजी, मुकेश मालोदे यांच्या हस्ते तृतीय पारितोषिक देण्यात आले.

मनोज चव्हाण यांच्या हस्ते विविध ट्रॉफी देण्यात आल्या. नागेश कायस्थ तर्फे मॅन ऑफ द टूर्नामेंट बक्षीस देण्यात आले. प्रथम पारितोषिक प्रशांत चव्हाण, शैलेश राठोड, अमोल बेडवाल यांच्या राऊडी बॉईजने, तर द्वितीय बक्षीस सोनू भावसार व विक्रांत क्षीरसागर, शुभम सावजी यांच्या सीएसके संघाने मिळवले. स्पर्धा पुष्कर दिनेश सावजी, वरद गवळी, आयुष सावजी, विजय पवार यांनी आयोजित केली होती. यामध्ये 60 खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. गणेश मालोदे, रोहन नागे, सुजित जोशी, मुकेश मालोदे, सुशील पवार, अक्षय खरोटे, कृष्णा खरोटे, शुभम सावजी, साईल खरोटे, यांनी पंच म्हणून काम केले. यावेळी दिनेश सावजी, गणेश सावजी, महेश सावजी, मयूर चौधरी, अक्षय पवार,हर्षल सावजी, केदार सावजी, कैवल्य भावसार,पवन जगताप, कुणाल सावजी, पीयूष सावजी, पवन जोशी, कल्पेश जोशी उपस्थित होते.



# निर्मला वसंत तांडेल यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालूक्यातील करळ येथील रहिवाशी तथा महिला



सामाजिक कार्यकर्त्या निर्मला वसंत तांडेल (वय ५५ वर्षे) यांचे दिनांक २४/१२/२०२३ रोजी दुःखद निधन झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते वसंत हसुराम तांडेल यांच्या त्या पत्नी होत्या. निर्मला तांडेल या करळ ग्रामपंचायत मध्ये २ वेळा ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत. ग्रामपंचायत सदस्य पदावर असताना त्यांनी गोर गरिबांची अनेक कामे निस्वार्थी वृत्तीने केली आहेत. अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत.पती,२ मुले असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. निर्मला तांडेल यांचा दशक्रिया विधी मंगळवार २/१/२०२४ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे तर उत्तर कार्य विधी शुक्रवार दि ५/१/२०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी करळ येथे होणार आहे. या दुःखद प्रसंगी कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याचे तांडेल परिवारामार्फत कळविण्यात आले आहे. निर्मला तांडेल यांच्या निधनाने करळ ग्रामस्थ व तांडेल परिवारात शोककळा पसरली आहे. मनमिळावू, प्रेमळ असल्यामुळे त्यांच्या निधनामुळे मोठया प्रमाणात नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी चंद्रपूरनगरी सज्ज

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात तयारी पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात 67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. 'मिशन ऑलिम्पिक 2036' हे एकच ध्येय डोळ्यांपुढे ठेवून आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा मंगळवार, 26 डिसेंबरला बल्लारपूर येथील तालुका क्रीडा संकुलात सुरू होणार आहे.
या स्पर्धेच्या निमित्ताने चंद्रपूरनगरीचा चेहरामोहरा बदलला आहे. विविध चौकांचे सौंदर्यीकरण झाले असून विविध संकल्पनावर आधारित रंगीबेरंगी चित्रांनी भिंती फुलल्या आहेत. अखिल भारतीय स्तरावरील या स्पर्धेसाठी चंद्रपूर नगरी सज्ज झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2036 मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा घेण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे मिशन ऑलिम्पिकच्या निमित्ताने उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचे उद्दिष्ट ठेवूनच बल्लारपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत. त्यानुसार, संपूर्ण तयारी झाली आहे. 26 ते 31 डिसेंबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून जवळपास 3 हजार खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, पंच, पालक, क्रीडा प्रशिक्षक आदी लोक सहभागी होणार आहेत. त्यांच्या भोजनाची आणि निवासाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ही स्पर्धा उत्कृष्टरित्या पार पडावी यासाठी आयोजन समिती, उद्घाटन समिती, स्वागत समिती, निवास व्यवस्था समिती, मदत कक्ष, भोजन समिती, क्रीडा कार्यक्रम व तक्रार निवारण समिती, स्थानिक पर्यटन समिती, प्रसिद्धी आणि पायाभूत सुविधा समिती, वाहतूक व्यवस्था समिती, सांस्कृतिक कार्य समिती, सुरक्षा समिती स्वच्छता समिती आदी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी वेळोवेळी आढावा घेऊन प्रशासनाला निर्देश दिले आहेत. त्यानुरूप स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण : बल्लारपूर येथील तालुका क्रीडा संकुलात होणा-या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते नियोजन सभागृह येथे नुकतेच करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड आदी उपस्थित होते. सूर्यनमस्कारातील मुद्रा, रंगबेरंगी भिंती, उड्डाणपूलावर रोषणाई : 67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने चंद्रपूर शहरातील उड्डाणपूलावरील दिव्यांवर तिरंगा रोषणाई करण्यात आली आहे. प्रमुख चौकांचे सौंदर्यीकरण झाले आहे. रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या दुभाजकावर सूर्यनमस्कारातील मुद्रा दर्शविणाऱ्या शिल्पाकृती बसविण्यात आल्या आहेत. रंगबेरंगी चित्रांनी भिंती रंगविण्यात आल्या आहेत.



अभिनेते सलमान खान यांच्या शुभेच्छा : भव्य अशा 67 वी राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी प्रसिद्ध अभिनेते सलमान यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात बल्लारपूर येथील क्रीडा संकुलमध्ये होणारी ही स्पर्धा यशस्वी व्हावी, अशी भावना अभिनेते सलमान खान यांनी त्यांच्या शुभेच्छापर संदेशातून व्यक्त केली आहे. त्याचसोबत जयंत दुबळे आंतरराष्ट्रीय जलतरणपटू, रोहिणी राऊत, माधुरी गुरनुले, ज्योती चव्हाण आंतरराष्ट्रीय धावपटू, सायली वाघमारे अथलेटिक्स परीक्षक यांनी देखील या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

थीम साँगला कैलाश खेर यांचे स्वर : 67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी थीम साँग तयार करण्यात आले आहे. या गाण्याला प्रसिद्ध पार्श्वगायक कैलाश खेर यांनी आवाज दिला आहे. 'आओ चंद्रपूर, खेलो चंद्रपूर ... खेलो ऐसा दिल लेलो चंद्रपूर ...' असे शब्द असलेले हे गीत विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची पेरणी करणारे ठरत आहे. लक्षवेधक शब्द, जोशपूर्ण संगीत आणि कैलाश खेर यांचा भावगर्भित आवाज ही या थीम साँगची वैशिष्ट्ये ठरत आहेत.



# भाऊ भोजने व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंग विदर्भ प्रदेश कार्याध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** २४ डिसेंबर रोजी बुलढाणा येथे झालेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या जिल्हा बैठकीमध्ये व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी भाऊ भोजने यांची विदर्भ कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली.
भाऊ भोजने जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार असून, सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असतात.पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. भाऊ भोजने यांना व्हाईस ऑफ मिडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल जी म्हस्के, जिल्हा अध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे, जैन साहेब, सिद्धेश्वर पवार यांच्या उपस्थितीत साप्ताहिक विंगच्या विदर्भ कार्याध्यक्ष पदी निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले.




# गौरी कुमावतची तायक्वांदोसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील तायक्वांदो खेळाडू तथा जामनेरच्या इंदिराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गौरी विजय कुमावत हिची मध्य प्रदेशातील बैतूल या ठिकाणी होणाऱ्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली.

लातूर येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद लातूर द्वारा आयोजीत शालेय राज्यस्तरीय तायक्वांडो स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत पहूर येथील शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी चे ५ खेळाडू सहभागी झाले होते. सदर स्पर्धेत इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जामनेर येथे १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असणारी गौरी विजय कुमावत हिने सुवर्ण पदक जिंकून मध्यप्रदेश येथिल बैतूल येथे होणाऱ्या नॅशनल तायक्वांदो स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणार आहे तर सानिका सुनिल पाटील हिने कांस्य पदकावर आपली मोहर उमटवली. लोचना चौधरी व इशांत चौधरी वेदांत क्षिरसागर यांचा उत्कृष्ठ सहभाग राहीला. त्यांना ईश्वर क्षिरसागर भूषण मगरे क्रीडा शिक्षक तथा प्रशिक्षक हरीभाऊ राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबुराव घोंगडे, सचिव भगवान घोंगडे, संचालक मंडळ , मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे तायक्वांदो असोसिएशनचे सचिव अजित घारगे, छत्रपती शिवाजी सांस्कृतिक मंडळाचे सचिव श्रीकृष्ण चौधरी, जळगाव जिल्हा अथॅलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजेश जाधव, जामनेर तालुका अथॅलेटिक्सचे सचिव गिरीष पाटील, रावेर तायक्वांदो असोसिएशनचे सचिव जिवन महाजन, जय बावस्कर, जय कासार शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीचे सर्व संचालक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी पालक यांनी अभिनंदन केले.

# गोंडवाना विद्यापीठाच्या राज्य आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गेल्या काही वर्षांत, भारताने आपत्तींना प्रतिसाद देण्यामध्ये, विशेषतः आपत्तीपूर्व शमनामध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. सरकार सर्व प्रकारच्या आपत्तींना तोंड देण्यासाठी सज्ज आहे. आपत्ती व्यवस्थापनात विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. विद्यार्थी आपत्ती बाबत जागरूकता पसरविण्यात मदत करू शकतात. आपत्तीसाठी तयार राहण्याच्या महत्त्वाबद्दल ते त्यांचे मित्र, कुटुंब आणि समुदाय सदस्यांना महत्त्वाचे संदेश देऊ शकतात.
सामूहिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये स्वभावाने मोठे धैर्य आणि तग धरण्याची क्षमता असते. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे समाजाला मोठ्या गरजेच्या वेळी खूप मदत होते. विद्यार्थ्यांना योग्यप्रकारे प्रशिक्षण दिल्यास, ते आपत्तीस्थळी पोहोचू शकतात आणि पूर, भूकंप, दुष्काळ इत्यादी वेळी आपत्ती व्यवस्थापन पथकाला त्वरित पुनर्वसनासाठी मदत करू शकतात. हे लक्षात घेऊन कुलपती कार्यालयाने सुरू केलेल्या कार्यक्रमांच्या मालिकेत 'आव्हान' ही अतिशय महत्त्वाचा उपक्रम म्हणून पुढे आला आहे.
विद्यार्थ्यांमध्ये समाजाला घडवण्याची क्षमता आणि आपत्तींसारख्या देशासमोरील प्रत्येक आव्हानाशी लढण्याची हिंमत असण्याचे स्वप्न माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिले असल्याने, मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की, प्रत्येक आपत्तीतून भारत सुरक्षित आणि विकसित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आव्हान शिबिरात विद्यार्थ्यांनी पूर्ण समर्पणाने सहभागी व्हावे असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी गोंडवाना विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यस्थानावरून बोलताना आज केले. यावेळी ते दूरस्थ पध्दतीने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनापूर्वी आव्हानच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.
या उद्घाटन समारंभा प्रसंगी मंचावर खासदार अशोक नेते, पोलीस अधीक्षक निलोत्पल, कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे ,प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, आमदार कृष्णा गजबे, जळगाव विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विनोद पाटील, स. समादेशक राष्ट्रीय आपदा मोचनबल प्रवीण धट ,सिनिअर इन्स्पेक्टर एन. डी.आर. एफ. कृपाल मुळे अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ.अनिल चिताडे , अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा डॉ. चंद्रमौली, गोंडवाना विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ. श्याम खंडारे , कोल्हापूर विद्यापीठाचे रासेयो संचालक तानाजी चौगुले, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य गुरुदास कामडी, प्रशांत मोहिते, प्रा.डॉ. विवेक जोशी , गोंडवाना विद्यापीठाचे परीक्षा संचालक डॉ. दिनेश नरोटे आदी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले , मी गोंडवाना विद्यापीठ आणि सर्व सहभागी राष्ट्रीय स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांचे अभिनंदन करतो कारण त्यांनी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर सुरू केले आणि त्यांना त्यांच्या प्रयत्नांमध्ये यश मिळावे अशी शुभेच्छा व्यक्त करतो. विद्यापीठाच्या वतीने स. प्रा.डॉ. मनीष देशपांडे आणि कृष्णा देवईकर यांनी राजभवनात जाऊन त्यांचे स्वागत केले. या प्रसंगी खासदार अशोक नेते म्हणाले, विद्यापीठाच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यात राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित केले त्यासाठी मी विद्यापीठाचे अभिनंदन करतो व अशा प्रकारच्या शिबिरामुळे येथिल विद्यार्थ्यांना फायदा होईल. जिल्ह्यात दरवर्षी येणाऱ्या पूर परिस्थितीमध्ये या विद्यार्थ्यांना सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी सहभागी होता येईल असे ते म्हणाले.

# आ. सातपुते यांच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा प्रश्न लागणार मार्गी!

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** गेल्या एकेचाळीस वर्षांपासून अकलूज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह भाड्याच्या इमारतीत आहे. त्याचे मासिक भाडे ८० हजार असतानाही त्याठिकाणी विद्यार्थ्यांची खूप दुरावस्था होत आहे.त्यामुळे या विद्यार्थी वसतिगृहाला शासकीय जागा उपलब्ध व्हावी, यासाठी सामाजिक बांधिलकी जोपासत ॲड. अविनाश काले, नागेश लोंढे व गौतम भंडारे या तीन पत्रकारांनी दोन दिवस पाण्याचा एक थेंबही न घेता उपोषण केले होते. तेव्हा याबाबत ठोस लेखी आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण स्थगित करून सदरची बाब आमदार रामभाऊ सातपुते यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर माळशिरसचे कर्तव्यदक्ष आमदार रामभाऊ सातपुते यांनी याबाबत नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केल्यानंतर हा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागल्याने आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांतून याबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.मागासवर्गीय विद्यार्थ्यांची निवास व भोजन याची सोय व्हावी म्हणून अकलूज येथे १९८२ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह सुरू केले. सुरूवातीला हे वसतिगृह बाजार समितीच्या आवारातील इमारतीत सुरू केले होते.तेथून ते खाजगी मालकीची अपुरी जागा असलेल्या इमारतीत जुन्या बस स्थानकाच्या मागील बाजूस स्थलांतरित करण्यात आले.आज अखेर शासनाने या वसतिगृहासाठी २ कोटीच्या आसपास रुपये मोजले आहेत. अकलूजमधील शैक्षणिक व्यवस्था पाहता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाची अकलूजमध्ये स्वंतत्र इमारत होणे अपेक्षित होते, परंतु ते अद्यापही झालेले नाही.म्हणूनच विद्यार्थ्यांची हेळसांड लक्षात घेऊन या वसतिगृहाच्या स्वतंत्र इमारतीसाठी सदरच्या पत्रकारांनी उपोषण केले होते. तेव्हा मागील हिवाळी अधिवेशनात माळशिरस तालुक्याचे कर्तव्यदक्ष आमदार रामभाऊ सातपुते यांनी याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पत्रव्यवहार करून सदरचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला होता.तो प्रश्न तेव्हाच मार्गी लागला असता.मात्र कामकाजाच्या दरम्यान पुण्याच्या कसबा मतदारसंघाच्या आमदार स्व. मुक्ता टिळक यांचे दुःखद निधन झाल्यामुळे तो प्रश्न राहून गेला होता असे आमदार राम सातपुते यांनी सांगितले होते.मात्र नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर गौतम भंडारे यांनी माळशिरस येथे आमदार राम सातपुते यांना भेटून डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाचा प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडण्याची विनंती केली होती.तेव्हा आमदार रामभाऊ सातपुते यांनी सदरचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्याने या अधिवेशनातच कॅबिनेट बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे म्हटले.

# अजून एक वाघ मृतावस्थेत

## दीड महिन्यात तब्बल सात वाघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज



दीड महिन्यात सात वाघांचा मृत्यू – पहिली घटना चिमूर वनपरिक्षेत्रात 14 नोव्हेम्बरला , 2 वाघांच्या झुंजीत एकाचा मृत्यू झाला होता . त्यानंतर 18 नोव्हेम्बरला ताडोबामध्ये नैसर्गिकरित्या मृत्यू, 10 डिसेंबर ला वरोरा वनपरिक्षेत्रात अपघातात वाघाचा मृत्यू, 14 डिसेंबर पळसगाव येथे नैसर्गिकरित्या वाघाचा मृत्यू, 21 डिसेंम्बरला विजेचा धक्का लागून सिंदेवाही वनपरिक्षेत्रात वाघाचा मृत्यू झाला, 24 डिसेंबर ला शिकारीच्या शोधात असलेला वाघ विहिरीत पडला ही घटना तळोधी वनपरिक्षेत्रात घडली . तर आज 25 डिसेंम्बरला सावली वनपरिक्षेत्रात कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळला .

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील सावली वनपरीक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या व्याहाड (खुर्द) उपवन परिक्षेत्रातील सामदा बुज. वन बीटात कंपार्टमेंट नंबर २०१ मधील रामदास देवतळे सामदा बुज यांच्या अतिक्रमित शेतात सोमवार दि. २५ रोजी सकाळी एक वाघ मृतावस्थेत आढळून आल्याने वनविभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात मागील दीड महिन्यात झालेला वाघाचा हा 7 वा मृत्यू आहे. घटनेची माहिती वनविभागाला मिळताच सावली वनपरीक्षेत्राचे प्रभारी वनपरीक्षेत्र अधिकारी राजूरकर आणि व्याहाड खुर्द उपवन क्षेत्राचे अतिरिक्त क्षेत्र सहाय्यक आर.जी. कोडापे व त्यांच्या चमुने घटनास्थळ गाठून वाघाच्या मृतदेहास ताब्यात घेतले व शवविच्छेदनासाठी पाठविले. सदर वाघ ही मादी असून 1 वर्षाची आहे. शवविच्छेदन केल्यावर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. तोवर या मादी वाघिणीचा मृत्यू कशामुळे झाला याबाबत स्पष्टपणे सांगता येणार नाही अशी प्रतिक्रिया वनविभागाच्या वतीने देण्यात आली. मृतावस्थेत आढळून आलेले वाघाचे शव सडलेल्या अवस्थेत आहे. कदाचित या वाघीनिचा मृत्यू तीनचार दिवसापूर्वी झाला असावा, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. ताडोबा हे पट्टेदार वाघांसाठी जगात प्रसिद्ध आहे. पण गेल्या दीड महिन्यात तब्बल सात वाघांचा मृत्यू झाल्याने वन विभागात मात्र चांगलीच खळबळ माजली आहे.



# पुल कठड्याला अखेर रंगरंगोटी

आधुनिक केसरी न्यूज

**चाँदखाँ पठाण**

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील ठिकठिकाणचे अनेक पुल कामे करण्यात आली यात पुल कठाड्याला रंगरंगोटी व पुलवर सवानीकरण काम सोडून देण्यात आले होते यात या संदर्भात विभागाला बातम्या द्वारे अवगत करण्यात आले होते .यात ठेकेदाराची चालढकल व विभागांचे दुर्लक्ष त्यामुळे ते कामे रखडली होती.याबाबत वरिष्ठ अधिकारी कार्यालयांकडे लेखी तक्रार देवून काम पूर्ण झाल्यानंतरच बीले द्यावी अशी मागणी करण्यात आली होती.याची दखल विभागाने घेतली असुण पुल कठाड्याला रंगरंगोटी सुरु झाल्याचे दिसून आले.खुलताबाद तालुक्यांतील सुलतानपूर मंडळ व बाजार सावंगी मंडळ मध्ये गोळे गाव, बाजार सावंगी, सावंगी- फुलंब्री रस्ता, पाच पुलकामे वगळता मंडळ मधील सावंगी जैतखेडा रस्ता चार पुले, झरी- बोडखा एक पुल,बोडखा टाकळी काटशेवरी जटवाडा रस्ता सहा पुल,सावंगी -इंदापूर रस्ता एक पुल,लोणी-चिकलठाणा रस्ता दोन पुल आदि ठिकठिकाणच्या पुलांची कामे करण्यात आली परंतु पैसा बचत म्हणून ठेकेदारांने चालढकल करत वेळ मारुन नेत. कठड्याला रंगरंगोटी काम तसेच सोडण्याची व पैसे बचत करण्याचा प्रयत्न चालवला व स्थानिक अधिकारी व कर्मचारी यांचे दुर्लक्षीतपणा त्यामुळे कामाशिवायच बील काढण्याची नियत ठेवून होते.या संदर्भात बातम्या द्वारे विभागाला अवगत करण्यात आले तरी विभाग दुर्लक्ष करून होते यासंदर्भात वरिष्ठांकडे लेखी तक्रार देवून चौकशी व कारवाईची मागणी नागरिकांनी केली. यावर विभागाने आदेशीत केली की नाही माहीत नाही परंतु ठेकेदाराकडून झरी बोडखा रस्त्या लगत पुल कामांवर रंगरंगोटी करतांना दिसुन आली. याप्रमाणेच तालुक्यात केलेल्या सर्व पुल कामाची रंगरंगोटी करुन घेण्यात यावे तद्नंतरच बील अदा करण्यात यावे असी मागणी नागरिकांतून आहे.

# ज्ञानज्योतीच्या जयंतीनिमित्त नेत्र शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ज्ञानज्योती क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या




१९३ व्या जयंती निमित्त पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन, हेल्पएज इंडिया व एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पाडेगाव (नेवसेवस्ती) ता.फलटण येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व डोळ्यांच्या इतर आजारांचे अचूक निदान व उपचार शिबीर गुरूवार दि.२८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले आहे, अशी माहिती पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश बनकर यांनी दिली.मोतीबिंदू शिबिरासाठी ६० वर्षे वय असणाऱ्या रुग्णांनाचं सहभागी होता येईल. शस्त्रक्रियेसाठी निवडलेल्या रुग्णांना शिबीराच्या दिवशीच घेऊन जाण्यात येईल व शस्त्रक्रिया करण्यात येईल. शस्त्रक्रियेनंतर परत आणून सोडण्यात येईल.शस्त्रक्रिया करण्यात येणाऱ्या रुग्णांची जाण्या येण्याची,राहण्याची व जेवणाची मोफत सोय करण्यात येईल.रुग्णानी शस्त्रक्रियेस येताना स्वतःचे रेशनकार्ड /आधार कार्ड सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.मोतीबिंदू शस्त्रक्रिया व्यतिरिक्त डोळ्यांच्या इतर आजारांवर वयाची अट नाही.तसेच सर्व शस्त्रक्रिया ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील.सदर शिबिरासाठी पाडेगाव आणि पंचक्रोशीतील तसेच फलटण तालुक्यातील गरजू लोकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा.असे आवाहन करण्यात आले.हे शिबीर श्री संत सावता माळी मंदिर,नेवसेवस्ती येथे सकाळी ९ ते ३ या वेळेत होणार आहे.या शिबिरासाठी नेत्र तज्ञ व्ही देसाई नेत्र रुग्णालय,महंमदवाडी,हडपसर,पुणे हे असणार आहेत. या शिबिरात सहभागी होण्यासाठी गिरीश बनकर,प्रशांत ढावरे, दिपक सुतार,आबा मोरे,नरेश गायकवाड,रोहन ढावरे,रोहित नेवसे यांच्याशी संपर्क साधावा.असे सांगण्यात आलेले आहे.

# पत्रकार संदीप काळे यांना 'रूपाली दूधगावकर' राष्ट्रीय साहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** सुप्रसिद्ध लेखक, पत्रकार, निवेदक, संघटक संदीप



काळे (मुंबई) यांना यावर्षीचा 'रूपाली दुधगांवकर' राष्ट्रीय साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती शिवार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली.

संदीप काळे हे नामवंत लेखक आहेत. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९८२ ला नांदेड जिल्ह्यातील पाटनूर या गावात झाला. संदीप काळे यांचे वडील रामराव काळे हे शेतकरी आहेत. त्यांच्या आई कमलबाई ऊर्फ मुक्ताबाई या गृहिणी आहेत. अनेक टीव्ही कार्यक्रमांचे संपादक म्हणून काम केलेले संदीप काळे आज राज्यातील आघाडीच्या दैनिकात संपादक म्हणून कार्यरत आहेत. आतापर्यंत मराठी, हिंदी आणि इंग्रजीतून संदीप काळे यांची ६७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मु. पो. आई, ट्रेल्थफेल, ऑल इज वेल, प्रेमसेतू या चार पुस्तकांनी खपाचे सर्व विक्रमी रेकार्ड केले आहेत. ही चारही पुस्तके सर्व भाषांत आली असून अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाला लागलेली आहेत.

वर्ल्ड रेकार्ड, इंडिया बुक रेकार्ड आणि लिमका बुक रेकार्डमध्ये संदीप काळे यांनी लिखाणाच्या माध्यमातून अनेक रेकार्ड केले आहेत. साहित्य, शासन, सामाजिक संस्था आणि पत्रकार संघातर्फे संदीप काळे यांना आतापर्यंत ३८० पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी आतापर्यंत एकूण २६ देशांचा अभ्यास दौरा केला आहे. अनेक पत्रकारिता महाविद्यालयांत त्यांनी प्राध्यापक म्हणूनही सेवा बजावली आहे. काळे यांचा 'भ्रमंती लाईव्ह' हे सदर खूप लोकप्रिय आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' या देशातील नंबर एकच्या पत्रकार संघटनेचे संदीप काळे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. 'व्हॉईस ऑफ मीडिया'मध्ये देशात सदतीस हजार पत्रकार सदस्य काम करतात. आज १९ देशांत 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे काम पोहचले आहे. पत्रकार संदीप काळे यांचे शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक कार्य लक्षात घेऊन, त्यांना रूपाली दुधगांवकर हा मागील २२ वर्षांपासून दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये रोख आणि असे आहे. त्रीसदस्यीय निवड समितीने संदीप काळे यांच्या नावाची एकमताने निवड केली. या पुरस्काराचे वितरण लवकरच मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात येणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी दिली. पत्रकार परिषदेला उप-प्राचार्य प्रा. मुंजाजी दाभाडे, डॉ. विलास पाटील, प्रा. पांडूरंग निळे, गजानन खैरीकर यांची उपस्थिती होती. आतापर्यंत कवयित्री अनुराधा पाटील, रंगनाथ पठारे, कवी भुजंग मेश्राम, शाम मनोहर, अरुण काळे, प्राचार्य भगवान देशमुख, जयराम खेडेकर, भ. मा. परसवाळे, संजीवनी तडेगावकर, डॉ. किशोर सानप, श्रीधर अंभोरे, सुचिता खल्लाळ, श्रीकांत देशमुख, विद्याधर म्हैसकर, इंद्रजित घुले, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. प्रज्ञा दया पवार, मंगेश काळे, डॉ कविता मुरुमकर, डॉ. मीनाक्षी पाटील या मान्यवर सहित्यिकांना 'रूपाली दुधगांवकर' राष्ट्रीय साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

# वैजापुरात रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मानवतेचा जागर अंतर्गत येथील बेलगांव रस्त्यालगत असलेल्या मदरसा हजरत खालिद बिन वलिद उर्दू प्राथमिक शाळा व जमिया खैरूनिसा गुलाम रसूल व एमजी एम वस्तानवी उर्दू प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार(ता,२४) रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले या शिबिरात सामाजिक बांधिलकी जपत युवक वर्गाने मोठ्या प्रमाणात रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उदघाटन सामाजिक कार्यकर्ते व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत करण्यात आले,त्यांनी विशद केले की, सर्व प्रकारच्या दानात रक्तदान हे श्रेष्ठ असून,सामाजिक बांधिलकी जपत पात्र युवकांनी रक्त दान करून गरजवंतांचे प्राण वाचवून सामाजिक ऋण फेडावे असेही ते पुढे म्हणाले, माजी उपनगराध्यक्ष मजीद शेठ कुरेशी, डॉ. अश्विन जोशी, मदरसा प्रमुख नादीम भाई, नूर हॉस्पिटल वरुडी ता. बदनापूर जि. जालनाच्या ब्लड बँकेचे डॉ. आर.सी. महाजन, डॉ,देशमुख,डॉ,केदार पाटील, ब्लड बँक चे विवेक मोरे, महंमद मुश्ताक,शेख सलीम वैजापूरी, मन्सूर भाई,शेख राजू यांची उपस्थिती होती. नादीम भाई व मजीद कुरेशी यांनी उपस्थिताना संबोधित केले. सूत्र संचलन व प्रास्ताविक शमीम सौदागर यानी केले.

# जिंतूर तहसील कार्यालय ग्राहक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतुर :** राष्ट्रीय ग्राहक हक्क दिना निमित्ताने जिंतूर तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्राहकांना हक्कांची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्कांबाबत सक्षम व्हावा, यासाठी विविध संघटना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जागरुकता निर्माण करतात. यासाठीच 24 डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. त्याच प्रमाणे जिंतूर तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ग्राहक कसा जागृत असायला हवा त्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

येथील तहसील कार्यालयात विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत जागतिक ग्राहक दिन रविवार 24 डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार राजेश सरवदे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गुलाबराव शिंदे अध्यक्ष अखिल भारतीय ग्राहक पंचायत, आशाताई खिल्लारे शहराध्यक्ष अखिल भारतीय ग्राहक पंचायत, यांच्यासह सदर कर्यक्रमात मोठया प्रमाणात विविध संघटनेचे पदाधिकारी व नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला यात ग्राहक संघटनेचे तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर रोकडे, दिलीप देवकर, महेश देशमुख, मंचकराव जगताप, सुमनताई प्रधान,संजय आढे ,रफिक तांबोळी यावेळी राशन दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष हकिम भाई ,वकील संघाचे उपाध्यक्ष वाय.पी.देशमुख, यांच्यासह तहसील कार्यालयाचे वाजिद, मिर्झा शब्बीर,अब्दुल सईफ, यांची यावेळी कार्यक्रमास उपस्थिती होती यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सय्यद जुनेद यांनी केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# फुलंब्रीत मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने साखळी उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील महात्मा फुले चौकात मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मनोज पाटील जरांगे यांना समर्थन म्हणून मागील गेल्या २३ दिवसापासून साखळी उपोषण सुरू होते. ते आता स्थगित करण्याचा निर्णय रविवारी (ता.२४) घेण्यात आला. याबाबत उपोषण स्थगित करीत असल्याचे पत्र मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पोलिस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांना देण्यात आले. फुलंब्री तालुक्यातील मराठा क्रांती मोर्चाची बैठक २४ नोव्हेंबर २०२३ रोजी घेण्यात आली होती. या बैठकीत दोन डिसेंबर पासून मनोज जरांगे पाटील यांना समर्थन म्हणून महात्मा फुले चौकात २४ डिसेंबर २०२४ पर्यंत साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याच अनुषंगाने दोन डिसेंबर पासून शहरातील मुख्य चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते. या साखळी उपोषणात तालुक्यातील सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी हजेरी लावून मराठा आरक्षणाचे समर्थन केले.

२३ डिसेंबर रोजी बीडच्या इशारा सभेत मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारी २०२४ पर्यंत आंदोलने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. २० जानेवारीला मुंबई येथे आझाद मैदानावर उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा श्री. जरांगे यांनी या सभेतून दिला. त्यामुळे फुलंब्री येथे महात्मा फुले चौकात तब्बल २३ दिवसापासून सुरू असलेल्या साखळी उपोषणासंदर्भात मराठा क्रांती मोर्चान बैठकीचे आयोजन रविवारी (ता.२३) केले होते. तसेच या बैठकीदरम्यान पोलिसांनी सदरील आंदोलन स्थगित करून सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. या सर्व गोष्टीचा विचार करून २० जानेवारी २०२४ पर्यंत सदरील साखळी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत घेण्यात आला.



# जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज





**कन्नड :** येथील जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व शिक्षण महर्षी जे.के. जाधव सर सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड जि छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ जन्मोत्सव व युवक दिन महोत्सवानिमित्त कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय साखर कारखाना कन्नड येथे दिनांक 12 जानेवारी 2024 रोजी सकाळी नऊ ते चार या वेळेत जिल्ह्यातील पाचवी ते दहावीच्याच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय (वर्ष 21 वे) वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचा विषय खरंच !भारताची वाटचाल महासत्तेकडे होते आहे काय?होय / नाही स्पर्धा कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड जिल्हा येथे 12 जानेवारी 2024 रोजी संपन्न होणार आहे. स्पर्धेचे बक्षीस व पुरस्कार पुढीलप्रमाणे आहे --- सांघिक प्रथम जिजाऊ चषक प्रथम रुपये 5001, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र द्वितीय रुपये-3501,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तृतीय -रुपये2001-स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ (एकूण पाच बक्षीस) प्रत्येकी रुपये 500 स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे असून स्पर्धेचे नियम पुढीलप्रमाणे आहेत 1) एका शाळेतून दोन विद्यार्थ्यांचा एक संघ असेल एक विद्यार्थी अनुकूल बाजूवर व एक विद्यार्थी प्रतिकूल बाजूवर बोलणारा असावा. 2) स्पर्धक पाचवी ते दहावी या वर्गातील असावा. 3)स्पर्धकास विचार मांडण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देण्यात येईल. 4 )सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. 5) स्पर्धेची फीस सांघिक वीस रुपये राहील. 6)आयोजक संस्थेचे विद्यालय बक्षीसास पात्र असणार नाही. जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मा श्री सागरजी जाधव सचिव जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ व संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी के जाधव सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड यांनी केले आहे .अधिक माहितीसाठी मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण पर्यवेक्षक रावसाहेब निकम सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रदीप सनंसे देविदास चौधरी गणेश डव्हारे यांचे कडे करावा असे आव्हान करण्यात आले.

# देविदास वाघमोडे यांना सामाजिक सेवा गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील पिशोर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांना सु- लक्ष्मी बहु उद्देशीय सेवाभावी संस्था व माणूसकी रुग्णसेवा समुह घाटी यांच्या वतीने दिला जाणारा, सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.सहायक पोलिस निरीक्षक देविदास बाळासाहेब वाघमोडे हे मुळचे डिग्रस पोस्ट महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर येथील आहे. एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या देविदास वाघमोडे यांनी बारावीपर्यंत औपचारिक शिक्षण पुर्ण करुन २००५ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी पोलिस दलात पोलीस कॉन्स्टेबलपदी भरती झाले. यानंतर त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ येथून बीए ची पदवी संपादन करून, २०११ मध्ये जे खात्या अंतर्गत झालेल्या सरळ सेवा परीक्षेत फौजदार म्हणून त्यांची निवड झाली. आतापर्यंत त्यांनी ठाणे शहर, बुलढाणा, वाशीम, छत्रपती संभाजीनगर, कोतवाली (अहमदनगर) लोणार, शेगांव (शहर), सोनाळा, बुलढाणा (शहर), कारंजा (ग्रामीण), वाशिम, कन्नड (शहर), फदीपूर अशा वेगवेगळ्या ठिकाणी यशस्वीरीत्या कामकाज सांभाळून आता पिशोर पोलिस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून आपली सेवा बजावत आहे.

त्यांच्या कार्याची दखल घेऊन, त्यांना आजपावेतो राज्यस्तरीय ज्ञानपंख गौरव पुरस्कार, समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख सिलोड, महाराष्ट्र पोलिस भूषण पुरस्कार आदि पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कुमारी लक्ष्मी सुमित पंडीत हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मौलाना आझाद रिसर्च सेंटर, टीव्ही सेंटर रोड छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत करण्यात आलेल्या एका सोहळ्यात २९ डिसेंबर २०२३ रोजी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन, सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांना गौरविण्यात येणार असल्याचे, सु- लक्ष्मी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने सुमित पंडीत यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले.

# नांदा तांडा येथे श्रीमद् भागवत हरिनाम सप्ताहाची सांगता

## हभप संदीप महाराजांचा माजी सरपंच चव्हाण यांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे मीक्षदा एकादशी गीता जयंती दिंडी नगर प्रदक्षिणा व श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे गावाकऱ्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.वै.हभप नारायण महाराज चारुनगर यांच्या प्रेरणेने हभप फुलसिंग महाराज साकेगाव, यांच्या आशीर्वादाने रामदेव बाबा मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, हनुमान मंदिर नांदा तांडा येथे श्रीमद् भागवत सप्ताह सुरुवात करण्यात आली होती.यावर्षीही दिनांक १७/१२/३/२३ रविवार पासुन २४/१२/२३ पर्यंत श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह कीर्तनाचे



आयोजन करण्यात होते.आज श्रीमद् भागवत सप्ताहाची समारोप दि.२४/१२/२३ रविवार रोजी करण्यात आला. हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांचे सकाळी नऊ ते अकरा काल्याचे कीर्तन झाले. तद्नंतर भाविक भक्त, पंचक्रोशीतील भाविक भक्त व गावातील ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.याशुभ प्रसंगी महाप्रसादाचे अन्नदाते दारासिंग बंडू चव्हाण,सौ.प्रभावती दारासिंग चव्हाण, यांच्या कडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.याप्रसंगी हभप संदीप महाराज ऋषीगढ महाल्बदा यांचा व श्रीमद् भागवत सप्ताहाला आलेले सर्व हभप महाराज लोकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पंचक्रोशीतील,गावातील नागरिकांनी व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांच्याद्वारे करण्यात आले होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर